




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक ७२ * नांदेड * मंगळवार, दि. १७ मार्च २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


## राज्यात आता पेट्रोल पंपावर केरोसिन भेटणार

### गॅस तुटवड्यावर राज्य सरकारचा तोडगा

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात घरगुती गॅस अर्थात एलपीजी तुटवड्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर उतारा काढण्यासाठी आता राज्य सरकारकडून बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर केरोसिन आणण्याची योजना आखण्यात आली असून हे केरोसिन पेट्रोल पंपावरच नागरिकांना उपलब्ध होणार आहे.

छगन भुजबळ यांनी राज्यातील गॅस टंचाईबाबत भाष्य करताना म्हटले की, मी बीपीसीएल, एचपीसीएल आणि आयओसीएल या पेट्रोलियम कंपन्यांच्या प्रतिनिधींशी सकाळी चर्चा केली. त्यांनी राज्यातील घरगुती गॅसचे दैनंदिन उत्पादन ९००० वरुन ११००० मेट्रिक टनपर्यंत वाढवल्याचे सांगितले. तसेच एलपीजी उत्पादनातील सगळ्या अडचणी दूर करण्याचे काम सुरु असल्याचे या कंपन्यांकडून सांगण्यात आले. सध्याच्या गॅस टंचाईतून मार्ग काढण्यासाठी घरगुती गॅसच्या उत्पादनाला सर्वाधिक प्राधान्य देण्यात आले आहे. यानंतर गॅस उरलाच तर रुग्णालये, शैक्षणिक संस्था, वृद्धाश्रम, स्मशानभूमी यांना एलपीजी उत्पादनात १०० टक्के प्राधान्य दिले जाईल. औषध उद्योगासाठी आणि संरक्षण क्षेत्रातील उपहारगृहांना एलपीजी वितरणात ५० टक्के प्राधान्य आहे, असेही छगन भुजबळ यांनी सांगितले.

यावेळी छगन भुजबळ यांनी केरोसिनच्या वापराबाबत भाष्य केले. त्यांनी म्हटले की, आपल्याकडे राज्यात केरोसिनचा भरपूर साठा आहे. उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना केरोसिन द्यायची गरज नाही, असे निर्देश मध्यंतरी न्यायालयाने दिले होते. मात्र, आता आम्ही सगळ्यांना केरोसिन उपलब्ध करण्यासंदर्भात न्यायालयाला कळवले आहे. त्यानुसार केरोसिन डिलर्सही केरोसिन देऊ शकतात. मात्र, मध्यंतरी आपण केरोसिन पूर्णपणे बंद केल्याने केरोसिन डिलर्सची साखळी तुटली होती.

## महापालिकेची पहिलीच सर्वसाधारण सभा चर्चेविना गुंडाळली

### शहरातील महत्त्वाचे विषय बाजूला करत महापुरुषांच्या पुतळ्यावरुन गदारोळ



**नांदेड (प्रतिनिधी)–** महापालिकेच्या विरोधी पक्षातील नगरसेवकांनी इतिवृत्त व पुतळा प्रकरणाबाबत केलेली चर्चेची मागणी धुडकावून लावत महापौर कविता मुळे, उपमहापौर दीपकसिंह रावत यांनी गोंधळातच पहिली सर्वसाधारण सभा आटोपती घेतली. शहरात माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचा पुतळा बसवाच सोबत टिपू सुलतान, माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम, इंदिरा गांधी, माता रमाई आंबेडकर यांच्याही पुतळ्याबद्दल विचार करावा अशी आग्रही भूमिका काँग्रेस- वंचितने लावून धरली होती.

तब्बल साडेतीन वर्षानंतर नांदेड वाघाळा महानगरपालिकेवरील प्रशासक राज संपुष्टात आल्यावर महापालिकेत सोमवार, दि.१६ मार्च रोजी पहिली सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. या महापालिकेत भाजप - शिवसेना व अपक्ष असे ५० नगरसेवक, काँग्रेस वंचित बहुजन आघाडीचे १५ तर एमआयएम पक्षाचे १४ नगरसेवक असे पक्षीय बलाबल आहे. सर्व नगरसेवक स्थानापन्न झाल्यानंतर महापौर कविता मुळे, उपमहापौर दिपकसिंह रावत, आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, उपायुक्त अजितपाल संधू यांच्या उपस्थितीत सर्वसाधारण सभा सुरू झाली. त्यात ४ विषय ठेवण्यात आले. मागील इतिवृत्ताला मान्यता देण्याबाबतचा विषय ठेवताच विरोधी पक्षातील काँग्रेस व वंचितचे अब्दुल गफार, प्रशांत इंगोले, राहुल सोनसळे यांच्यासह इतर नगरसेवकांनी या विषयावर चर्चेची मागणी केली. त्यामुळे एकच गोंधळ उडाला. भाजपचे गटनेते किशोर स्वामी यांनी तात्काळ त्या विषयाला बगल देत भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या नांदेड येथे पूर्णाकृती पुतळ्यास मान्यतेचा प्रस्ताव मांडला. त्यामुळे विषयावर चर्चा न करता सत्ताधारी त्यांचाच अजेंडा सुरू ठेवत असल्याचा विरोध करीत विरोधी पक्षातील काँग्रेस वंचित बहुजन आघाडीचे तसेच एमआयएम पक्षाचे नगरसेवक महापौरांच्या डायससमोर येऊन निषेध व्यक्त करीत होते. त्यामुळे सभेत गोंधळ निर्माण झाला. सत्ताधारी पक्षाचे नगरसेवक विरोधी पक्षाच्या नगरसेवकांना समजावण्याचा प्रयत्न करीत होते परंतु काँग्रेस- वंचितचे नगरसेवक ऐकण्यास तयार नव्हते. त्यांनी महापुरुषांच्या पुतळ्याबाबत चर्चा करण्याची मागणी रेटून धरली. अखेर १० ते १५ मिनिट हा गोंधळ महापौरांच्या समोर सुरू असल्यामुळे उपमहापौर दीपकसिंह रावत यांनी मागणी मान्य करून चर्चा करण्याचे सुचवले. यावेळी काँग्रेसचे अब्दुल गफार यांनी भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या पुतळ्याच्या प्रस्तावाला समर्थन दिले. त्याचवेळी त्यांनी माजी राष्ट्रपती तथा महान शास्त्रज्ञ एपीजे अब्दुल कलाम, आयर्न लेडी इंदिरा गांधी, माजी पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांचाही पुतळा शहरात उभारण्याची मागणी केली. त्यानंतर वंचित बहुजन आघाडीचे प्रशांत इंगोले यांनी टिपू सुलतान, बिरसा मुंडा, इंदिरा गांधी यांचेही शहरात पुतळे उभारावेत अशी मागणी केली. या सर्व गोंधळातच स्थायी समितीचे १६ महिला व बालकल्याण समितीचे ११ तर ८ स्वीकृत सदस्यांच्या नावाची घोषणा महापौर कविता मुळे यांनी केली. राष्ट्रगीताने सर्वसाधारण सभेची सांगता करण्यात आली. त्यानंतर महापौर कविता मुळे यांनी नवनियुक्त सदस्यांना आपल्या कक्षात बोलावून त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

## नांदेड जिल्ह्याला तीन दिवसांसाठी येलो अलर्ट जारी

### जिल्ह्यात वादळी वारे, विजेच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पावसाची शक्यता

**नांदेड (प्रतिनिधी)–** हवामान विभागाच्या दिलेल्या अंदाजानुसार नांदेड जिल्ह्यात दि. १७ ते १९ मार्चदरम्यान येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी १६ मार्च रोजीच्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी १७ व १९ मार्च २०२६ या दोन दिवसांसाठी येलो अलर्ट जारी केलेला आहे. १७ व १८ मार्च हे दोन दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा व १८ ते १९ मार्च २०२६ हे दोन दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

**या गोष्टी करा :** विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा.

**या गोष्टी करु नका :** आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली अंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाइन यांना स्पर्श करू नका तसेच कुठल्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या सहाय्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडाच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे टाकू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारातून अथवा खिडकीतून वीज पडताना पाहू नका. हे बाहेर थांबण्याइतकेच धोकादायक आहे.

## नांदेडमध्ये घरगुती गॅसचा काळाबाजार उघड; १० सिलिंडर जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** घरगुती व व्यावसायिक गॅस सिलिंडरची अवैध साठवणूक करून चढ्या दराने विक्री करणाऱ्यांविरुद्ध जिल्हा प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. जिल्हा पुरवठा विभागाने श्रीनगर भागात धाड टाकून १० रिकामे गॅस सिलिंडर जप्त केले असून संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घरातील श्रीनगर परिसरातील हनुमान मंदिर रोड येथे राहणारे मकसूद अहमद हे आपल्या राहत्या घरी घरगुती व व्यावसायिक गॅस सिलिंडरचा अवैध साठा करून चढ्या दराने विक्री करत असल्याची गोपनीय माहिती प्रशासनाला मिळाली होती. या तक्रारीची दखल घेत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी डॉ. जगदीश बारदेवाड व तहसीलदार संजय वारकड यांच्या नेतृत्वाखालील पथकाने १२ मार्च २०२६ रोजी संबंधित ठिकाणी आकस्मिक तपासणी केली.

तपासणीदरम्यान पथकाला एकूण १० रिकामे गॅस सिलिंडर आढळून आले. त्यामध्ये घरगुती वापराचे ७ सिलिंडर (एचपी-३, भारत गॅस-२, इंडेन-२) तर व्यावसायिक वापराचे ३ सिलिंडर (एचपी कंपनीचे) असे एकूण १० रिकामे सिलेंडर पंचासमक्ष जप्त करण्यात आले.

या प्रकरणात जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या कलम ३ व ७ तसेच लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस (Restriction on Use and Fixation of Selling Price) आदेश, २००० मधील तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे निष्पन्न झाल्याने निरीक्षण अधिकारी रवींद्र राठोड यांनी भाग्यनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार संबंधित आरोपीविरुद्ध जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या कारवाईत निरीक्षण अधिकारी रवींद्र राठोड, मुंजाभाऊ लोकरे, बालाप्रसाद वल्लाकट्टी, वेदनेश्वर घावट (जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय) तसेच नवदीप जाधव आणि विश्वनाथ शिंदे यांनी विशेष मेहनत घेतली.

घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर किंवा अवैध साठवणूक करून सर्वसामान्यांची लूट करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. अशा प्रकारच्या अवैध कृत्यांची माहिती मिळाल्यास नागरिकांनी तात्काळ प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी डॉ. जगदीश बारदेवाड यांनी केले आहे.

## मनपा स्थायी व महिला बालकल्याण समितीच्या सभापतीची निवड २४ रोजी

**नांदेड (प्रतिनिधी)–** महापालिकेच्या सोमवारी झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये स्थायी समिती, महिला बालकल्याण आणि सदस्यांची निवड करण्यात आली आहे. त्यानंतर आता २४ मार्च रोजी स्थायी समिती सभापती आणि महिला बालकल्याण सभापती पदाची निवड होणार आहे.

स्थायी समिती सदस्यांमध्ये भाजप शिवसेना महायुतीचे स. वीरेंद्रसिंघ गाडीवाले, सदाशिव पुरी, आशिष नेरलकर, सुमित मुथा, अभिषेक सौदे, तुळजाराम यादव, दिपाली मोरे, कविता गड्डम, सरिता बिरकले, नीलम यादव, एमआयएमचे अल्ताफ हुसेन, शिफा तरन्नुम अब्दुल रऊफ, बेबी शाईस्ता मोहम्मद सलमान खान आणि नांदेड लोकन्याय आघाडीच्या परविन बेगम शेख पाशा, सुनिता जोंधळे आणि राहुल सोनसळे यांचा समावेश आहे.

मनपा स्थायी व महिला बालकल्याण सभापती पदाची माळ नेमकी कोणाच्या गळ्यात पडेल याची उत्सुकता लागली आहे.

## उत्तरप्रदेशच्या व्यापाऱ्यांकडून नांदेडच्या व्यापाऱ्याची तीस लाखांची फसवणूक

### नांदेड ग्रामीण ठाण्यात गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** उत्तरप्रदेशच्या व्यापाऱ्याकडून नांदेड येथील व्यापाऱ्याची ३० लाख रूपयांची फसवणूक केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी तीन व्यापाऱ्यांविरूद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. २४ फेब्रुवारी २०२६ ते २८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान ज्ञानेश्वरनगर येथील फिर्यादीच्या ट्रेडिंग कंपनी, सिडको नांदेड येथे हा प्रकार घडला. आरोपी फरीद भैया (रा. लखनौ, उत्तर प्रदेश), रघुनंदन गोंडा (रा. उत्तर प्रदेश) व आलोक खरे (रा. उत्तर प्रदेश) यांनी संगनमत करून फिर्यादीकडून तांदूळ ठोक खरेदी करण्याच्या बहाण्याने बँक ऑफ बडोदा खात्यावर २० लाख रुपये पाठवले. त्यानंतर आणखी पैसे पाठवण्याची मागणी करत फिर्यादीकडून पुन्हा १० लाख रुपये मागवून घेतले. मात्र त्यानंतर आरोपींनी तांदूळ न देता तसेच घेतलेली रक्कम परत न करता फसवणूक केली. याप्रकरणी सोमनाथ दिनकर मिसाळ (वय ३०, रा. पांगरा, ता. आटी, जि. बीड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक ओमकार चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे सहकारी पोलीस करत आहेत.

## मनपाच्या आठ स्वीकृत, ‘स्थायी’च्या १६ सदस्यांची निवड

### भाजपकडून दिलीप कंदकुर्ते, डॉ. माधव देवसरकर, अमितसिंह तेहरा, सुप्रिया पाटील रातोळीकर, आशुतोष जोशी यांना संधी




**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील महानगरपालिकेच्या सोमवार, दि. १६ मार्च रोजी महापौर कविता संतोष मुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्वसाधारण सभेत स्थायी समिती, शिक्षण, महिला व बालकल्याण समिती तसेच स्वीकृत नगरसेवकांची निवड जाहीर करण्यात आली. यावेळी उपमहापौर दीपकसिंह रावत, आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, उपायुक्त अजितपालसिंग संधू, सभागृह नेता महेश कनकदंडे यांची उपस्थिती होती.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापौर कविता मुळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत मनपाच्या स्वीकृत सदस्यांची यादी जाहीर करण्यात आली. यात भाजपकडून अमितसिंह तेहरा, दिलीप कंदकुर्ते, आशुतोष जोशी, डॉ.अंकुश देवसरकर, सुप्रिया पाटील यांच्यासह वंचित- काँग्रेस आघाडीचे शेख बिलाल शेख रसुल, मुन्ना अब्बास हुसेन रजब अली, मोहंमद नासेर अहेमद महंमद इकबाल यांचा समावेश आहे. तसेच या सभेत स्थायी समिती सदस्यांची नावे जाहीर करण्यात आली. यात भारतीय जनता पार्टीचे विरेंद्रसिंघ गाडीवाले, सदाशिव पुरी, आशिष नेरलकर, सुमित मुथा, अभिषेक सौदे, तुळजाराम यादव, दिपाली मोरे, कविता गड्डम, सरिता बिरकले, निलम यादव तसेच एमआयएमचे शिफा तरन्नुम अब्दुल रऊफ, बेबी शाहिस्ता महंमद सलमान खान तर लोकन्याय विकास आघाडीचे परबिन बेगम शेख पाशा, सुनिता जोंधळे, राहुल सोनसळे यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे पूर्व प्राथमिक, माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांची यादी जाहीर करण्यात आली. यात भाजपच्या सदिच्छा सोनी (पाटील), निरंजना लांडगे, अमृता ठाकूर, संध्या देमगुंडे, सुलोचना काकडे, मनप्रितकौर कुंजीवाले, निलम यादव तसेच एमआयएमच्या अश्विनी धोंगडे, अलकेसरी सुमय्या गुलअफशा तर लोकन्याय विकास आघाडीच्या आफीया नाज काझी नाफे, राजश्री गोडबोले यांचा समावेश आहे.







जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ


गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# महासत्तांच्या संघर्षाचे नवे रणांगण

जगातील ऊर्जा राजकारणात काही भौगोलिक ठिकाणांना अत्यंत निर्णायक महत्त्व असते. मध्यपूर्वेतील होर्मुझची सामुद्रधुनी हे असेच एक संवेदनशील आणि धोरणात्मक स्थान आहे. जगातील मोठ्या प्रमाणातील कच्चे तेल आणि नैसर्गिक वायू याच मार्गाने जागतिक बाजारपेठेत पोहोचतो. त्यामुळे या जलमार्गाची सुरक्षितता ही केवळ प्रादेशिक नव्हे तर जागतिक अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. अलीकडे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या सामुद्रधुनीतील व्यापारी जहाजांच्या वाहतुकीच्या सुरक्षेसाठी इतर देशांनी पुढे यावे, असे आवाहन केले. परंतु या आवाहनाला इराणकडून तिखट प्रतिक्रिया मिळाली असून, त्यामुळे या भागा-तील तणाव आणखी वाढण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. ट्रम्प यांच्या मते, इराणकडून होर्मुझ सामुद्रधुनी बंद करण्याचे प्रयत्न सुरू असून, त्याचा फटका अनेक देशांना बसू शकतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर एकत्र येऊन या जलमार्गाची सुरक्षितता सुनिश्चित करणे आवश्यक आहे. त्यांच्या मते, अनेक देश, विशेषतः या मार्गावर अवलंबून असलेले देश, या भागात युद्धनौका पाठवून अमेरिकेसोबत सहकार्य करतील. ब्रिटनसह काही पाश्चिमात्य देशही या मोहिमेत सहभागी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. ट्रम्प यांनी असा दावा केला की, अमेरिकेने इराणची लष्करी क्षमता मोठ्या प्रमाणावर कमकुवत केली असली तरी इराणकडून छुप्या पद्धतीने हल्ले करण्याचा धोका कायम आहे. काही क्षेपणास्त्रे डागणे, ड्रोन पाठवणे किंवा जलमार्गात अडथळे निर्माण करणे अशा प्रकारच्या कारवाया करून इराण आंतरराष्ट्रीय व्यापारात अडथळे आणू शकतो, अशी अमेरिकेची भीती आहे. मात्र, इराणने अमेरिकेच्या या भूमिकेची उघडपणे खिल्ली उडवली आहे. इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अराघची यांनी सामाजिक माध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये अमेरिकेच्या तथाकथित सुरक्षा कवचावर तीव्र टीका केली. त्यांच्या मते, अमेरिकेचे सुरक्षा धोरण हे संकट रोखण्याऐवजी त्याला आमंत्रण देणारे ठरले आहे. त्यांनी असा आरोपही केला की, होर्मुझ सामुद्रधुनी सुरक्षित ठेवण्यासाठी अमेरिका आता इतर देशांकडे, अगदी चीनकडेही मदत मागत आहे. ही परिस्थिती अमेरिकेच्या प्रभावातील घट दर्शवणारी असल्याचे संकेत त्यांनी दिले. या भागातील शेजारी राष्ट्रांनी परदेशी शक्तींना येथे हस्तक्षेप करू देऊ नये. बाहेरील शक्तींचा या प्रदेशात असलेला हस्तक्षेप हा प्रादेशिक स्थैर्यासाठी धोकादायक आहे. विशेषतः इस्रायलच्या सुरक्षेच्या नावाखाली अमेरिकेसारख्या देशांनी या भागात लष्करी उपस्थिती वाढवली आहे. त्यामुळे इराणने शेजारी देशांना आवाहन केले आहे की, त्यांनी एकत्र येऊन बाह्य हस्तक्षेपाला विरोध करावा. या संपूर्ण घडामोडीतून एक मोठे वास्तव समोर येते की, मध्यपूर्वेतील राजकारण हे केवळ स्थानिक संघर्षापुरते मर्यादित राहिलेले नाही. येथे अमेरिका, चीन, रशिया आणि युरोपीय देश यांसारख्या महासत्तांचे हितसंबंध गुंतलेले आहेत. ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने होर्मुझ सामुद्रधुनीचे महत्त्व इतके मोठे आहे की, या मार्गात निर्माण होणारा कोणताही अडथळा जागतिक अर्थव्यवस्थेवर तत्काळ परिणाम करू शकतो. तेलाच्या किमती वाढणे, पुरवठा साखळी विस्कळीत होणे आणि जागतिक बाजारपेठेत अस्थिरता निर्माण होणे हे त्याचे संभाव्य परिणाम असू शकतात. दुसरीकडे, इराणला वाटते की, अमेरिकेची या प्रदेशातील लष्करी उपस्थिती ही त्यांच्या सार्वभौमत्वावर गदा आणणारी आहे. त्यामुळे ते स्वतःला या भागातील प्रादेशिक शक्ती म्हणून सिद्ध करण्याचा प्रयत्न करत आहेत. अमेरिकेच्या धोरणाला आव्हान देत इराण आपली भूमिका अधिक आक्रमकपणे मांडत आहे. परिणामी, दोन्ही देशांमधील शब्दयुद्ध आणि राजनैतिक संघर्ष तीव्र होत चालला आहे. या पार्श्वभूमीवर सर्वात मोठा प्रश्न असा आहे की, होर्मुझ सामुद्रधुनीभोवती निर्माण झालेला हा तणाव पुढे कोणत्या दिशेने जाईल? जर या भागात लष्करी चकमकी वाढल्या, तर त्याचे परिणाम केवळ मध्यपूर्वे पुरते मर्यादित राहणार नाहीत. जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर त्याचा मोठा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे या प्रश्नाचे समाधान केवळ शक्तिप्रदर्शनातून नव्हे, तर संवाद आणि राजनैतिक तोडग्यांतूनच शक्य आहे. अमेरिका आणि इराण या दोन्ही देशांनी आक्रमक भूमिका घेण्याऐवजी संयम राखणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय समुदायानेही या प्रश्नात संतुलित भूमिका घेत शांततापूर्ण मार्ग शोधण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. अन्यथा, होर्मुझ सामुद्रधुनीभोवती निर्माण झालेला हा वाद भविष्यात मोठ्या जागतिक संकटाचे रूप धारण करू शकतो.

# महिलांमध्ये आर्थिक साक्षरतेची आवश्यकता



आजच्या युगात महिला प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने पाऊल टाकून चालत आहेत, पण तरी-ही ती अनेक बाबतीत मागेच आहेत. त्यापैकी एक प्रमुख क्षेत्र म्हणजे महिलांची आर्थिक साक्षरता. या बाबतीत फक्त गरीब, ग्रामीण आणि अशिक्षित महिलाच मागे नाहीत, तर शहरी मध्यमवर्गीय आणि उच्चवर्गीय सुशिक्षित महिलांमध्येही आर्थिक साक्षरता आणि माहितीचा अभाव दिसून येतो. २०२०-२१ मध्ये ग्लोबल फायनान्शिअल लिटरसी एक्सलन्स सेंटर (GFLE) ने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, भारतीय प्रौढ लोकसंख्येपैकी केवळ २४ टक्के लोक आर्थिक बाबतीत साक्षर आहेत. इतर प्रमुख उदयोन्मुख अर्थव्यवस्थांच्या तुलनेत भारताचा आर्थिक साक्षरता दर सर्वात कमी आहे. महिलांच्या बाबतीत तर परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. ते राज्यानुसार ४ टक्के ते ५० टक्क्यांपर्यंत आहे.

महाराष्ट्र, दिल्ली आणि पश्चिम बंगाल या महानगर क्षेत्रांमध्ये अनुक्रमे १७ टक्के, ३२ आणि २१ टक्के आर्थिक साक्षरता दर आहे. बिहार, राजस्थान, झारखंड आणि उत्तर प्रदेश या राज्यां-मध्ये, जिथे दारिद्र्य जास्त आहे, तिथे साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. हे आकडे आंतरराज्य असमानता देखील दर्शवतात. गोव्यात सर्वाधिक पन्नास टक्के महिला आर्थिक साक्षरता आहे, तर छत्तीसगडमध्ये आर्थिक साक्षरतेचा तीव्र अभाव आहे. तिथे आर्थिक साक्षरतेचा सर्वात कमी दर आहे, फक्त चार टक्के. आजकाल बँकांमधून होणारे व्यवहार वाढत असताना, क्रेडिट कार्ड आणि डेबिट कार्डे सामान्य झाली आहेत आणि आता मर्क्शलेसफ व्यवहारांवर भर दिला जात आहे, तेव्हा महिलांचा एक मोठा वर्ग बँकेची सामान्य कामेही करू शकत नाही. बँकेत पैसे जमा करणे किंवा काढणे असो किंवा एटीएम कार्ड वापरणे असो, बहुतांश महिला या सर्व कामांसाठी पती, मुलगा, भाऊ किंवा इतर कोणत्या तरी नातेवाईकावर अवलंबून असतात.

याचा फटका महिलांनाही अनेकदा सहन करावा लागतो. त्यांच्या खात्यातूनही मोठी रक्कम काढली जाते. कमी पैसे काढतो असे सांगून त्यांच्या खात्यातून जास्त रक्कम काढली जाते. एटीएमचा गैरवापर केला जातो. त्या महिलेच्या नकळत, तिला न सांगता तिच्या खात्यावर नामांकन केले जाते. कोऱ्या धनादेशांवर स्वाक्षरी घेतली जाते, मग नंतर मनमानी रक्कम भरली जाते आणि काढली जाते. थोडेफार ऑनलाईन समजणाऱ्या व त्यावरून व्यवहार करणाऱ्या महिलांना रिवॉर्ड पॉइंट्सच्या आधारे किंवा रोख मिळवण्याच्या नावावर 'ओटीपी' मागवून किंवा लिंक पाठवून त्यावर क्लिक करायला लावून त्यांच्या बँक खात्यातील जमा केलेली रक्कम काढली जाते. अशा अनेक घटनांच्या बातम्या वर्तमानपत्रातून किंवा चॅनेलमधून प्रसिद्ध होत असतात. बहुतांश घटनांमध्ये कारवाई होत नाही आणि पीडितेचे पैसे बुडतात. अनेक वेळा महिलेचे पुरुष नातेवाईक तिला बँकेच्या कामकाजाबाबत जाणूनबुजून ओळख करून देत नाहीत.

महिलांमध्ये आर्थिक साक्षरतेच्या कमतरतेचे दोन प्रकारचे परिणाम होतात. एक म्हणजे पैशाच्या व्यवहारात महिला पुरूष नातेवाईकांवर पूर्णपणे अवलंबून असतात. त्यांना असे कोणतेही काम करण्याचा आत्मविश्वास नसतो आणि काही कारणाने त्यांचे नातेवाईक जवळ नसतील तर त्यांचे संपूर्ण आर्थिक व्यवहार ठप्प होऊन जातात. दुसरे म्हणजे, आर्थिक साक्षरतेच्या अभावाला कारणीभूत बहुतेकदा स्त्रिया स्वतःच असतात. हे काम शिकण्या आणि करण्याबाबत त्या आळस करतात. काही तांत्रिक गोष्टी शिकून, समजून घेण्याचा प्रयत्नही करत नाहीत. या उदासीनतेचा फटका त्यांनाच सहन करावा लागत आहे. बँकांच्या सर्वसाधारण कामाच्या-बाबतीत महिलांची ही अवस्था असेल तर पैशांची गुंतवणूक कुठे करायची, कधी गुंतवणूक करायची, किती गुंतवणूक करायची आणि ती कशी मिळवायची, किती मिळवायची अशा गोष्टींची माहिती त्यांना असेल अशी अपेक्षा करणे निरर्थक आहे. विमा काढण्याबाबत तर बोलायची सोयच नाही. या कारणास्तव, महिला त्यांचे पैसे एकतर चुकीच्या ठिकाणी किंवा चुकीच्या व्यक्तीद्वारे गुंतवतात आणि फसतात.

आजकाल विधवा आणि परित्यक्ता अशा महिलांची एकाकी जीवन जगण्याची प्रवृत्तीही वाढत चालली आहे. अशा परिस्थितीत त्यांना मुलांचे शिक्षण, लग्न, घरबांधणी आदींसाठी मोठ्या प्रमाणावर पैशांची गरज असते. बचत केली नसल्याने त्यांना बाहेरून किंवा सावकारांकडून कर्ज घ्यावे लागते. आर्थिक साक्षरतेअभावी त्या सेठ-सावकारांच्या किंवा खासगी संस्थांच्या तावडीत आडकतात. तेथे त्यांना उच्च व्याजदराने कर्ज घ्यावे लागू शकते, ज्याची परतफेड करणे त्यांच्यासाठी कठीण होऊन बसते. त्यांची मालमत्ता जप्त केली जाते किंवा हडप केली जाते. एक मजबूत आर्थिक शिक्षण प्रणाली महिलांना त्यांच्या बचत आणि गुंतवणुकीचे प्रभावीपणे व्यवस्थापन करण्यास मदत करू शकते. याद्वारे, त्या त्यांची बचत अशा प्रकारे गुंतवू शकतात की त्यांना त्यातून जास्तीत जास्त लाभ मिळू शकेल आणि ठेवीची रक्कम देखील सुरक्षित असेल. त्याचप्रमाणे सामाजिक सुरक्षेच्या दृष्टिकोनातून महिलांना योग्य विमा संरक्षण मिळणेही आवश्यक आहे. आजारपणाच्या बाबतीत आरोग्य विमा संरक्षण देखील आवश्यक आहे. यामुळे उपचारासाठी खर्च केलेल्या मोठ्या रकमेची व्यवस्था करण्यास मदत होते. जेणेकरून त्यांना आणि त्यांच्या कुटुंबास आजारपणाच्या वेळी उपचार घेण्यास आर्थिक त्रास होऊ नये. हेदेखील केवळ महिलांच्या आर्थिक साक्षरतेमुळेच शक्य आहे.

यंदाच्या सर्वसाधारण अर्थ-संकल्पात केंद्र सरकारने लोकांमध्ये आर्थिक साक्षरता वाढवण्यासाठी अशासकीय स्वायत्त संस्थांच्या माध्यमातून या दिशेने प्रयत्न करण्याची तरतूद केली आहे. शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी, महिला, ग्रामीण आणि शहरी गरीब, संरक्षण कर्मचारी आणि ज्येष्ठ नागरिकांसह विविध लक्ष्य गटांपर्यंत केंद्रीय बँक आणि सामान्य बँकिंग संकल्पनांचे ज्ञान पोहोचवण्याच्या उद्देशाने भारतीय रिझर्व्ह बँकेने 'वित्तीय साक्षरता योजना' नावाचा प्रकल्प सुरू केला आहे. आर्थिक शिक्षण २०२०-२०२५ साठी राष्ट्रीय धोरण तयार करण्यात आले आहे. त्याअंतर्गत डिजिटल व्यवहारांच्या सोयी, डिजिटल व्यवहारांची सुरक्षा, व्यवहारात खबरदारी, ग्राहकांच्या हिताचे रक्षण याबाबत आवश्यक ती व्यवस्था करण्याची तरतूद करण्यात आली आहे. 'सेबी', रिझर्व्ह बँक आणि इतर संस्था देखील वेळोवेळी जाहिरातींद्वारे बँक व्यवहार आणि ऑनलाइन फसवणूक रोखण्यासाठी माहिती देतात, जेणेकरून आर्थिक साक्षरता वाढू शकेल. या सर्वांमध्ये महिलांच्या जास्तीत जास्त सहभागाची गरज असल्याचे सांगण्यात आले आहे.

आज देशातील जवळपास १.४ अब्ज लोकसंख्येमध्ये ज्यात निम्म्याहून अधिक महिला आहेत, त्यांच्यामध्ये आर्थिक जागरूकतेचा दीर्घकाळापर्यंत चालणारा प्रभाव पडेल. देशातील शाळा, महाविद्यालये, महिला बचत गट, अंगणवाडी केंद्रे इत्यादींमध्ये आर्थिक शिक्षणाला महत्त्व देऊन, त्यामध्ये काम करणाऱ्या महिलांना आर्थिक साक्षरतेबाबत विशेष प्रशिक्षण देण्याची गरज आहे, जेणेकरून त्या त्यांच्या संपर्कात येणाऱ्या महिलांना आवश्यक माहिती देऊ शकतील. गटाशी संबंधित महिला त्यांच्या स्तरावर माहिती, प्रशिक्षण देऊ शकतात. शहरी आणि ग्रामीण भागात काम करणाऱ्या बँकांनीही महिलांना आर्थिक व्यवहारांची माहिती देण्यासाठी वेळोवेळी कार्यक्रम राबवावेत, जेणेकरून त्यांना बँकिंगशी संबंधित माहिती मिळू शकेल. बँक आणि आर्थिक कामाचे ज्ञान नसलेल्या महिलांनी स्वतः पुढे येऊन शिकण्याचा प्रयत्न करण्याची गरज आहे. किमान, बँक खाते उघडणे, चेक भरणे, पैसे जमा करणे, पैसे काढणे, जमा करणे, एटीएम वापरणे, ऑनलाईन पेमेंट करणे इत्यादीसारख्या सामान्य कामाच्या गोष्टींचे ज्ञान असणे आजच्या युगात खूप महत्वाचे झाले आहे.

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत, जि. सांगली

# बंधने फक्त महिलांवरच का ?

आज २१ व्या शतकात पुरुष आणि महिला असा कोणताच भेद राहिला नाही. आज महिलाही पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहेत. असे कोणतेच क्षेत्र नाही जिथे महिला पुरुषांची बरोबरी करू शकत नाही. कला, क्रीडा, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे मात्र समाजात आजही असा एक घटक आहे ज्यांना महिलांची ही प्रगती खटकत आहे. आजही तो घटक महिलांना केवळ चूल आणि मूल या पुरतच मर्यादित ठेवू इच्छितो म्हणूनच हे सनातनी विचारांचे प्रतिगामी लोक महिलांना सतत या ना त्या कारणांहून ट्रोल करत असतात. कधी ते महिलांच्या केशभूषे वरून ट्रोल करतात तर कधी ते महिलांना त्यांच्या वेशभूषेवरुन ट्रोल करतात.

आजच्या मुली मुलांप्रमाणे कपडे घालतात, जीन्स पॅन्ट, टी शर्ट घालतात. त्यांच्या जीन्स पॅन्ट गुडघ्यावर फाटलेल्या असतात याचा त्यांना राग येतो तर कधी मुलींच्या नटण्या मुरडण्याचा त्यांना राग येतो तर कधी त्या व्यायामासाठी सोईस्कर असलेले छोटे कपडे घालून व्यायाम करतात म्हणून त्यांना महिलांचा राग येतो. असाच एक प्रसंग नुकताच घडला. प्रसिद्ध मराठी अभिनेत्री ऐश्वर्या नारकर यांनी त्यांच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर योगासने करतानाचा व्हिडिओ शेअर केला. या व्हिडिओमध्ये त्यांनी व्यायामासाठी सोईस्कर असलेले छोटे कपडे परिधान केले होते. मात्र एका नेटकऱ्याला ही गोष्ट खटकली आणि त्याने त्यांच्या व्हिडिओवर नकारात्मक कमेंट करत थेट सल्ला दिला, कॅमेरा समोर तरी पूर्ण कपडे घालून योगा करत जा. अर्थात या कमेंटवर ऐश्वर्या नारकर यांनी त्या ट्रोल करणाऱ्या नेटकऱ्याचा चांगलाच समाचार घेतला.

सोशल मीडियावर ऐश्वर्या नारकर यांनी नेटकऱ्याला दिलेले उत्तर चांगलेच चर्चेत आहे. महिलांना ट्रोल करण्यात सर्वसामान्य नागरिकच आघाडीवर आहेत असे नाही तर समाजातील प्रतिष्ठित घटकही मागे नसतात. महिला गुडघ्यावर फाटलेली जीन्स घालतात हे कसले संस्कार असे ? असा प्रश्न मध्यंतरी उत्तरांचलच्या मुख्यमंत्र्यांनी जाहीर सभेत विचारला होता. केवळ हेच महाशय नाही तर अनेकजण महिलांच्या वेशभूषेवरुन म हिलांना टार्गेट करत असतात वास्तविक कोणी कोणते कपडे वापरायचे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. सार्वजनिक ठिकाणी गुडघ्यावर फाटलेली जीन्स पॅन्ट फक्त महिलाच घालतात का? पुरुषही फाटलेली जीन्स घालतात.

बरमुडा किंवा शॉर्ट पॅन्ट घालून गावभर फिरतात पण त्यांच्या कपड्यावर कोणीच आक्षेप घेत नाही. म्हणजे पुरुषांनी कसलेही कपडे वापरले तरी चालेल मात्र महिलांना ते स्वातंत्र्य नाही. म हिलांना मात्र त्यांच्या आवडीचे कपडे घालायला बंदी. मग प्रश्न येतो बंधने फक्त महिलांवरच का? महिलांनी कोणते कपडे घालावेत हे ठरवण्याचा अधिकार पुरुषांना कोणी दिला? महिलांनी कोणते व कसे कपडे घालावेत, महिलांनी कोठे फिरावे, काय खावे, काय प्यावे हे पुरुषांनी ठरवावे ही तर अठराव्या शतकातील मानसिकता झाली.

२१ व्या शतकातही महिलांना समान अधिकार मिळत नाही त्यांना त्यांच्या अधिकारासाठी झगडावे लागते ही दुर्दैवाची बाब आहे. स्त्री पुरुष समानता ही फक्त बोलण्यापूरतीच आहे हेच या म नसिकतेतून दिसून येते. जगात एकीकडे महिलांना समान अधिकार मिळावेत यासाठी चळवळ उभी केली जात आहे तर आपल्याकडे महिलांनी कसे राहायचे, तिने कोणते कपडे घालायचे, कसे कपडे घालायचे यावर चर्चा केली जाते. प्रश्न महिलांनी कसे आणि कोणते कपडे घालायचा हा नसून प्रश्न त्यांच्या निवडीच्या स्वातंत्र्याचा आणि महिलांच्या मानवी हक्काचा आहे. हे हक्क कोणीही हिरावून घेऊ नये. महिला गुडघ्यावर फाटलेली जीन्स घालतात, तोकडे कपडे घा-लतात म्हणून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार होतात असा तर्क लढवला जातो.

महिला संध्याकाळी बाहेर फिरायला जातात म्हणून त्यांच्यावर बलात्कार होतात असाही दावा तथाकथित संस्कृती रक्षक करतात पण ते सोयीस्करपणे हे विसरतात की आपल्या देशात अंगभर कपडे घातलेल्या साठ - सत्तर वर्षाच्या वृद्धेवर देखील बलात्कार होतो. विकृत मानसिकता असलेले लोक अंगभर कपडे घातलेल्या महिलांकडे देखील विकृत नज-रेने पाहतात. अंगभर कपडे असोत की तोकडे कपडे असोत ज्यांची मानसिकता विकृत आहे त्या नराधमांना महिला केवळ भोगवस्तू वाटते. महिलांच्या कपड्यांवर भाष्य करण्याऐवजी ही पुरुषी मानसिकता बदलली तर देशात महिला अत्याचाराच्या घटना घडणार नाही.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# जागतिक निद्रा दिवस...



झोपेचाही दिवस साजरा केला जातो तो पण जागतिक स्तरावर! ऐकून थोडं विचित्र वाटलं असेल ना? पण हे खरं आहे. आजच्या या धावपळीच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात लोकांची जीवनशैली पूर्णपणे बदलली आहे.सुदृढ आरोग्यासाठी झोप किती महत्त्वाची आहे आणि ती न मिळाल्यास काय दुष्परिणाम भोगावे लागू शकतात याची जाणीव करून देण्यासाठी मार्चचा तिसरा शुक्रवार जागतिक निद्रा दिवस म्हणून साजरा केला जातो.


खरे पाहाता झोप न लागणे हा आजार आहे, पण या गोष्टीपासून सामान्य जनता अनभिज्ञ आहे. याकडे खरंच गांर्भियाने पाहाणे आवश्यक आहे. शरीराच्या सर्व क्रीयांप्रमाणे झोप ही पण अत्यंत म हत्त्वाची बाब आहे. प्रत्येक व्यक्तीसाठी सहा ते नऊ तास झोप घेणे हे अत्यंत गरजेचे आहे. सध्याची पिढी ही व्हॉट्सअप, फेसबुक, इस्टाग्राम यावरच आपला जास्तीजास्त वेळ घालवत असते, त्याम ुळे रात्रीदेखील याचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. त्यामुळे रात्रीची झोपमोड होत असून, त्याचा शरीरावर परिणाम होत असतो. मधुमेह, रक्तदाबाच्या समस्या उद्‌भवतात. या विषयी जनजागृती व्हावी म्हणून वर्ल्ड स्लीप डेच्या निमित्ताने वर्ल्ड स्लीप सोसायटीद्वारे अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

जगातील ८८ हून अधिक देशांमध्ये वर्ल्ड स्लीप डे मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. १७ मार्च २००८ मध्ये अच्छी नींद लें, पूरी तरह से जागृत रहें या घोषवाक्यासह सर्वप्रथम वर्ल्ड स्लीप डे साजरा केला गेला, आणि तो आज मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातोय. पुरेशा झोपेचे फायदे पाहताना आपल्याला असे लक्षात येईल की, चांगली झोप घेतल्यामुळे हृदय आणि रक्तदाब सुरळीत राहण्यास मदत होते. योग्य प्रमाणात झोप घेतल्या-मुळे शरीरातील पेशीमध्ये वाढ होण्यास मदत होते. त्यामुळे साहजिकच रोगप्रतिकारक शक्ती वाढते. विसराळू व्हायचे नसेल तर भरपूर झोपा. लहान मुलांमध्ये झोपेत बडबडणे, खूप स्वप्न पाहणे, झोपेत चालणे अशा प्रकारची लक्षणे दिसल्यास त्यावर त्वरित निदान गरजेचे आहे. साधारणत: लहान मुलांना १० तासांची झोप आवश्यक असते. पालकांनी या गोष्टीसाठी दक्ष राहून आपल्या मुलांना योग्य प्रकारे झोप मिळेल याची दक्षता घ्यावी. नियमित व्यायामाने निद्रा चक्र सुधारण्यास मदत होऊ शकते. त्यासाठी व्यायामाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. तसेच जर तुम्हांला झोपेत घोरण्याची सवय असेल तर त्याकडं दुर्लक्ष करु नका. कारण हे घोरणं हार्ट अटॅक, ब्लडप्रेशर आणि डायबेटीस यांसारख्या आजाराला निमंत्रण देऊ शकतं.

सर्व विकत घेता येत, पण झोप विकत घेता येत नाही. आपल्या पायाशी भलेही सुख लोळत असेल, पण सुखाची झोप मिळणे देखील नशिबात असाव लागतं. आधुनिक काळात लोक मोठ्या प्रमाणावर बाहेरचे खाणे, चुकीची दिनचर्या, ताण-तणाव आणि अत्यंत कमी झोपेमुळे विविध प्रकारच्या आजाराने अक्षरक्षः त्रस्त आहेत. कमी झोप आणि तणाव यांचा मानसिक आरोग्यावर परिणाम होतोय. लोकां-मध्ये जनजागृती करुन त्यांना पुरेशा झोपेचे महत्त्व पटवून देणे हे जागतिक निद्रा दिवस सोसायटीचे हे कार्य खरचं कौतुकास्पद आहे. स्वस्थ राहा... मस्त राहा...पुरेशी झोप घ्या. जागतिक निद्रा दिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

**-रुपाली वागरे/वैद्य**
नांदेड
मो. ९८६०२७६२४१

# पर्यावरण आणि पशु-पक्ष्यांचे संरक्षण आवश्यक...



पर्यावरण म्हणजे आपल्या आजूबाजूचे नैसर्गिक वातावरण. हवा, पाणी, जमीन, झाडे-झुडपे, पशु-पक्षी आणि माणूस हे सर्व पर्यावरणाचे महत्त्वाचे घटक आहेत. पर्यावरण आणि पशु-पक्षी यांचा एकमेकांशी खूप जवळचा संबंध आहे. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावतात. मानवाच्या जीवनासाठी पर्यावरण अत्यंत महत्त्वाचे आहे. जर पर्यावरण स्वच्छ आणि संतुलित राहिले तरच पृथ्वीवरील जीवन सुरक्षित राहू शकते. त्यामुळे पर्यावरणाचे जतन आणि पशु-पक्ष्यांचे संरक्षण करणे ही आजच्या काळाची मोठी गरज आहे.

प्राचीन काळापासून माणूस, प्राणी आणि पक्षी एकत्र निसर्गात राहात आले आहेत. जंगल, नद्या, पर्वत आणि झाडे ही त्यांची नैसर्गिक घरे आहेत. पशु-पक्षी पर्यावरणातील विविध कामे करतात. काही पक्षी बिया पसरवतात, काही प्राणी जंगलाचे संतुलन राखतात. त्यामुळे निसर्गाची साखळी टिकून राहते. जंगलतोड झाल्यामुळे अनेक पक्ष्यांचे निवासस्थान नष्ट होत आहे. हवा, पाणी आणि जमिनीचे प्रदूषण वाढल्यामुळे त्यांचे जीवन धोक्यात येत आहे. यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे आणि अनेक पक्षी नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

आजकाल वाढते प्रदूषण, जंगलतोड आणि मानवी हस्तक्षेप यामुळे अनेक पशु-पक्ष्यांचे जीवन धोक्यात आले आहे. अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आ-हेत. जर पशु-पक्षी नष्ट झाले तर पर्यावरणाचा समतोल बिघडेल. म्हणून जंगलांचे संरक्षण, झाडे लावणे आणि प्रदूषण कमी करणे ही आपली जबाबदारी आहे. प्रत्येकाने पर्यावरण आणि प्राण्यांबद्दल दयाळू व जागरूक राहिले पाहिजे. पर्यावरण आणि पशु-पक्षी हे एकमेकांवर अवलंबून आहेत. त्यांचे रक्षण केल्याशिवाय पृथ्वीवरील जीवन सुरक्षित राहू शकत नाही.

म्हणूनच आपण सर्वांनी पर्यावरणाचे जतन करणे आवश्यक आहे. निसर्गाचे संतुलन राखण्यासाठी हीच काळाची गरज आहे. पर्यावरण जपण्यासाठी जास्तीत जास्त झाडे लावणे. पाणी व वीज वा-चवणे पक्षी आणि प्राण्यांना इजा न करणे उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था करणे अशा लहान कृतींमुळे पर्यावरण सुरक्षित राहते आणि पशु-पक्ष्यांचे जीवन जर आपण आज काळजी घेतली तर भविष्यातील पिढ्यांना सुंदर आणि निरोगी पर्यावरण मिळेल. पर्यावरणाचे आणि पशु-पक्ष्यांचे संरक्षण करणे ही आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. आपण आजपासूनच छोटे-छोटे प्रयत्न केले तर पृथ्वी अधिक सुंदर, हिरवीगार आणि जीवनासाठी सुरक्षित राहील.

**-श्रीकांत संभाजी मगर**
नांदेड.
मो. ९६८९११७१६९

# भारतीय उच्चशिक्षण व संशोधनात 'इन्फ्लिबनेट' केंद्राचे योगदान महत्त्वपूर्ण -प्र. कुलगुरु डॉ. अशोक महाजन



**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय उच्चशिक्षण आणि संशोधन क्षेत्रात 'इन्फ्लिबनेट' केंद्राचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. या केंद्राच्या विविध उपक्रम व सेवांचा लाभ केवळ विद्यापीठांनीच नव्हे तर संलग्नित महाविद्यालयांनीही घेतला पाहिजे, असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे ज्ञानस्रोत केंद्र व इन्फ्लिबनेट केंद्र, गांधीनगर (गुजरात) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युझर अवेयरनेस प्रोग्रॅम ऑन आयआरआयएनएस अँड इन्फ्लिबनेट सर्विसेस फॉर स्कॉलरली कम्युनीटीज या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते अध्यक्षीय भाषणात बोलत होते. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी यांनी केले.

याप्रसंगी इन्फ्लिबनेट केंद्र, गांधीनगर येथील शास्त्रज्ञ हितेशकुमार सोळंकी व प्रल्लभ प्रधान यांनी इन्फ्लिबनेटच्या विविध सेवांची व उपक्रमांची सविस्तर तांत्रिक माहिती दिली. व्यासपीठावर विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, अधिसभा सदस्य डॉ. विष्णू पवार आणि आयक्यूएसी संचालक डॉ. बी. एस. रेड्डी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मुंबई दूरदर्शनचे वृत्त निवेदक अमेय रानडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रविंद्र लाठकर यांनी केले, पाहुण्यांचा परिचय अपर्णा वाघमारे व डॉ. शरद चव्हाण यांनी करून दिला, तर आभार प्रदर्शन डॉ. महेश स्वामी यांनी केले.

या कार्यशाळेत प्राध्यापक, ग्रंथपाल व संशोधक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. एस. बी. देशमुख, डॉ. अरुण हंबर्डे, सुनील जाधव, डॉ. राजीव वाघमारे, डॉ. वैजनाथ हंगरगे, विठ्ठल मोरे, संदीप डहाळे, के. एस. सिद्दीकी, मोहनसिंग पुजारी, कु. प्रमिला बडगे, नितीन राठोड, डी. एस. पोपळे, तिरुपती हंबर्डे योगेश हंबर्डे व राहुल चव्हाण यांनी विशेष परिश्रम घेतले.

# ग्रामीण टेक्निकल कॅम्पसने मिळविली राज्यस्तरीय डिपेक्स -२०२६ स्पर्धेची जनरल चॅम्पियनशिप

## राज्यस्तरीय प्रकल्प स्पर्धेत चार पारितोषिके जिंकत संस्थेचा नवा विक्रम



**नांदेड (प्रतिनिधी)–** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद व 'सृजन' यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील पॉलिटेक्निक, इंजिनीअरिंग व फार्मसी संस्थातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित राज्यस्तरीय प्रकल्प स्पर्धा डिपेक्स -२०२६ स्पर्धेत ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस, विष्णुपुरी नांदेडच्या विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर करीत तब्बल चार पारितोषिके पटकावली. या स्पर्धेची जनरल चॅम्पियनशिप अर्थात सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त केले आहे.

या स्पर्धेत राज्यातील शासकीय व अशासकीय तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी व फार्मसी संस्थातून सुमारे ३००० विद्यार्थ्यांचे नाविन्यपूर्ण प्रकल्पांच्या सादरीकरणासाठी नामांकन प्राप्त झाले होते. त्यातून शास्त्रशुद्ध निकषांच्या आधारे सुमारे ३०० दर्जेदार प्रकल्पांची निवड करण्यात आली. यापैकी एकूण २२ नाविन्यपूर्ण, समाजोपयोगी व व्यावसायिकदृष्ट्या उपयोगी प्रकल्प हे एकट्या ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पसच्या विद्यार्थ्यांचे होते. हा डिपेक्स - २०२६ मधील एक उच्चांक नोंदविला गेला. या प्रकल्पाचे प्रदर्शन दि. ५ ते ८ मार्च २०२६ दरम्यान एमआयटी कॉलेज कॅम्पस, छत्रपती संभाजीनगर भरवण्यात आले होते. ज्यातून परीक्षकांनी विजेत्या संशोधनात्मक आणि प्रयोगशील प्रकल्पांची निवड केली. यातून एकट्या ग्रामीण संस्थेने ४ प्रकल्पांसाठी विजेतेपद प्राप्त करीत या राज्यस्तरीय स्पर्धेचे जनरल चॅम्पियनशिप अर्थात सर्वसाधारण विजेतेपद मिळविले आहे.

**हायड्रोजन बेस्ड प्रॉपल्शन सिस्टीम –** संस्थेच्या मेकॅनिकल विभागामार्फत सादर करण्यात आलेल्या या प्रकल्पात टाकाऊ अल्युमिनियमपासून हायड्रोजन वायू तयार करून त्याचा इंधन म्हणून वापर करून वाहन चालविण्याची नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर करण्यात आला होता. पर्यावरणपूरक व भविष्यातील ऊर्जास्रोत म्हणून हायड्रोजनच्या वापराचा विचार या प्रकल्पातून प्रभावीपणे व यशस्वीरीत्या मांडण्यात आला. या प्रकल्पाचे सादरीकरण आणि त्यामागील वैज्ञानिक संकल्पना पाहून परीक्षकांनी विद्यार्थ्यांच्या तांत्रिक ज्ञानाचे विशेष कौतुक केले.

**फास्टेस्ट डिलिव्हरी ड्रोन:**

संस्थेच्या इलेक्ट्रॉनिक्स विभागातर्फे हा अभिनव प्रकल्प सादर करण्यात आला, ज्यात आपत्कालीन परिस्थितीत अत्यावश्यक औषधे, रक्त किंवा वैद्यकीय साहित्य अत्यंत वेगाने दूरस्थ, दुर्गम ठिकाणी पोहोचविण्यासाठी हा ड्रोन विकसित करण्यात आला आहे. आपत्कालीन परिस्थितीत वापराच्या उद्दिष्टाने तयार करण्यात आलेल्या या ड्रोनचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सादर केले. या प्रकल्पामुळे आपत्कालीन वैद्यकीय सेवांना गती मिळू शकते व बाधितांचे प्राण देखील वाचवण्यास मदत होईल असा विश्वास परीक्षकांनी व्यक्त केला.

**साऊंड वॉरिअर : एआय आधारित पेस्ट डिटेरंट**

संस्थेच्या संगणक विभागाच्या या प्रकल्पामध्ये ध्वनीतरंगांच्या साहाय्याने धान्य कोठारांमधील झुरळ, उंदीर, घूस, पाल, भोंगे व इतर कीटकांमुळे होणारी धान्याची नासाडी रोखणारी यंत्रणा मांडण्यात आली. या प्रकल्पात देशपातळीवर शासकीय व खाजगी धान्य कोठारांमध्ये होणाऱ्या धान्याच्या नासाडीचे प्रमाण पाहता या प्रकल्पाची उपयुक्ततेने परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले. विशेषता या प्रकल्पात विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचे उपयोजन करून तो अधिक प्रभावशाली बनविला असल्याचे सांगण्यात आले.

# नांदेड विभागात अभियांत्रिकी विभागाकडून वार्षिक सुरक्षा परिसंवादाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** उन्हाळ्याच्या तीव्र हंगामापूर्वी रेल्वे मार्गांची सुरक्षितता अधिक मजबूत करण्यासाठी दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील अभियांत्रिकी विभागाने सोमवारी विभागीय मुख्यालयात वार्षिक सुरक्षा परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास सर्व गँगमेट्स, पीडब्ल्यूआय एडीईएन तसेच वरिष्ठ विभागीय अभियंता (समन्वय) नारायण प्रसाद श्रीवास्तव, वरिष्ठ विभागीय अभियंता/पश्चिम एन. सतीश, विभागीय अभियंता ईशान्य अपूर्व आणि अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक कल्याण राजू यांची उपस्थिती होती. यामुळे सुरक्षित रेल्वे वाहतुकीवरील विभागाचा विशेष भर अधोरेखित झाला.

या एकदिवसीय परिसंवादात उन्हाळ्यातील वाढत्या तापमाना-मुळे रेल्वे रुळांमध्ये होणारे प्रसरण, कोरड्या हवामानामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी आणि ट्रॅकमनच्या सुरक्षेशी संबंधित महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. IRPWM²-२०२४ मार्गदर्शक तत्त्वांनुसार ट्रॅक देखभाल, गस्त वाढविणे, मान्सूनपूर्व तयारी, रेल्वे रुळांचे तापमान मोजण्यासाठी थर्मामीटरचा वापर अशा आधुनिक पद्धतींवर विशेष भर देण्यात आला. तसेच वेळेवर गवत व झाडी साफ करणे, बॅलेस्टची मजबुती राखणे आणि आपत्कालीन परिस्थितीत तत्पर प्रतिसाद देण्यासाठी सराव (ड्रिल) घेण्याबाबतही सूचना देण्यात आल्या.

मार्च महिन्यात आयोजित होणारा हा वार्षिक परिसंवाद उन्हाळ्यात उद्भवणाऱ्या संभाव्य धोक्यांबाबत सर्व कर्मचाऱ्यांना सजग करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

# जातीयवादाचे चक्र तोडण्याचा वैज्ञानिक फॉर्म्युला कांशीराम यांनी दिला -इंजि. देगलूरकर

**नांदेड (प्रतिनिधी)–** नकारात्मकता आणि जातीय-वादाचे चक्र तोडण्याचा वैज्ञानिक फॉर्म्युला कांशीराम यांनी दिला आहे. त्यानुसार सामाजिक विंग्सच्या माध्यमातून गावे जोडावित आणि राजकीय विंग्सच्या माध्यमातून जागृती करावी, असे आवाहन अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर यांनी केले.

अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषद जिल्हा शाखा नांदेडच्या वतीने नाईकनगर नांदेड येथील मयूर टॉकीज परिसर येथे बहुजन नायक मान्यवर कांशीराम यांच्या ९२ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरात अध्यक्षीय समारोप प्रसंगी इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर बोलत होते. सामाजिक कार्यकर्ते गुणवंत मिसलवाड यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

आपल्या प्रशिक्षणात इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर पुढे म्हणाले की, जोपर्यंत संपूर्ण राजकीय सत्ता प्राप्त करणार नाही तोपर्यंत आम्ही आराम करणार नाही असे म्हणत वैज्ञानिक, सामाजिक व राजकीय तत्वज्ञ असलेल्या मान्यवर कांशीराम यांनी शारीरिक परिस्थितीने मजबूर होऊन आपला प्राण त्यागला. त्यांच्या पश्चात आज बहुजन चळवळ गतप्राण झाली आहे. बहुजन चळवळीतील आत्माच हरवला आहे, असे देगलूरकर म्हणाले.

ही बहुजन चळवळ पुनर्जीवित करायची असेल तर भारतीय संविधानाला हत्यार बनवून राजकीय शक्ती तयार करावी लागेल. त्यानंतर कांशीराम यांच्याप्रमाणे आपला स्वतःचा मीडिया बनवावा लागेल. क्षेत्रीय भाषेत आपले मुखपत्र आणि वृत्तपत्र आपण छापले पाहिजेत. आपल्या प्रशिक्षण संस्था उभारल्या पाहिजेत, आपले बहुजन फोर्स तयार करावेत. तसेच लेखक, विचारवंत व चिंतक मोठ्या प्रमाणात चळवळीत जोडावे लागणार आहेत. चमचा युग संपवून सर्व बहुजनांनी एक होऊन सत्ता ताब्यात घ्यावी त्याशिवाय भारतात संपूर्ण सामाजिक परिवर्तन होऊ शकणार नाही असेही विचार इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर यांनी मांडले.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते गुणवंत मिसलवाड आणि महिला नेत्या सौ. मंगल रमेश दुधंबे यांनी मान्यवर कांशीराम यांच्या जीवन कार्यावर सविस्तर अभ्यासपूर्ण विचार मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वैचारिक वारसा कांशीराम यांनी पुढे चालविला, असे मत सौ. मंगल दुधंबे यांनी यावेळी व्यक्त केले. युवा पिढी व्यसनांच्या आहारी जात असल्याने त्यांना वाचविण्यासाठी एखादी मोहीम हाती घेण्याचे आवाहन जमात ए इस्लामी हिंदचे सदस्य मोहसिन खान यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राज्य संघटक उत्तम गायकवाड यांनी केले तर शेवटी युवा नेते हणमंत उतकर यांनी आभार मानले. राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक शेख नूर यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. इंजि. अ. खवी साब, के. के. कांबळे, सोनाजी ढाकणीकर, राम सागुरे, विपुल देगलूरकर, सुशील हराळे, संजय बनसोडे, शशी काळे, गौरव जाधव, सौ. अनिता देगलूरकर, सौ. प्रियंका देगलूरकर, सौ. डिंपल साळे, सौ. शिंपल उतकर, सौ. पार्वती वाघमारे, सौ. रुक्मिणीबाई खोतकर, सौ. सुशीला वराळे, सुनिता जोगदंड, सविता वाडकर आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

# भदंत ग्यानरक्षित थेरो यांची १९ रोजी धम्मदेसना

**नांदेड (प्रतिनिधी)–** भदंत ग्यानरक्षित थेरो यांची १९ मार्च रोजी धम्मदेसनाचे आयोजन करण्यात आले आहे.



फाल्गुन पौर्णिमा ही मार्च महिन्यामध्ये येते. या पौर्णिमेला राजा सिद्धोधन यांच्या निमंत्रणावरून तथागत भगवान गौतम बुद्ध यांनी बुद्धत्व प्राप्त केल्यानंतर पहिल्यांदाच कपिलवस्तू या ठिकाणी आपल्या जन्म गावास भेट दिली. या ठिकाणी सिद्धार्थ गौतम बुद्ध भिक्षाटन करत असतांना पाहून राजा सिद्धोधनास दुःख झाले. त्यावेळेस तथागत भगवान गौतम बुद्ध यांनी सांगितलं की, आमचा बुद्ध वंश आहे; राजवंश नाही. चारिका करण्याची परंपरा तथागत गौतम बुद्धांनी पाळली. नंतर राजा सिद्धोधन, भगवान गौतम बुद्ध आणि बुद्ध संघास भोजनाचे निमंत्रण दिले आणि भोजनानंतर तथागत भगवान गौतम बुद्धाने प्रवचन दिले. या प्रवचनानंतर राजासिद्धोधन स्रोतापन्न झाले याच भेटीच्या नंतर सिद्धार्थ गौतम बुद्ध यांचा मुलगा राहूल, चुलत भाऊ आनंद आणि देवदत्त हेही बौद्ध भंते झाले. या पार्श्वभूमीवर तालुक्यातील खुरगाव-इंदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात १९ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वा. फाल्गुन पौर्णिमेनिमित्त छत्रपती संभाजीनगर येथील भदंत ग्यानरक्षित थेरो यांची प्रमुख धम्मदेसना या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती श्रामणेर प्रशिक्षण केंद्राचे संचालक धम्मगुरू भदंत पंय्याबोधी थेरो यांनी दिली.

# आकांक्षा गायकवाड मृत्यूप्रकरणी आरोपींना तत्काळ अटक करून आर्थिक मदत करण्याची मागणी



**नांदेड (प्रतिनिधी)–** आकांक्षा मुंजाजी गायकवाड यांच्या मृत्यू प्रकरणातील आरोपींना तत्काळ अटक करून पीडित कुटुंबाला एक कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी डॉ. अण्णाभाऊ साठे क्रांती सेना (एबीएस फोर्स) महाराष्ट्र राज्याच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, आकांक्षा मुंजाजी गायकवाड ही उच्च शिक्षण घेणारी विद्यार्थिनी होती. ती आपल्या कुटुंबासह राहत होती. मात्र काही दिवसांपूर्वी तिचा मृत्यू संशयास्पद परिस्थितीत झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. सदर प्रकरणाचा सखोल तपास करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या घटनेमुळे गावकवाड कुटुंबावर मोठे दुःख कोसळले असून त्यांना मानसिक व आर्थिक धक्का बसला आहे. त्यामुळे शासनाने पीडित कुटुंबाला तत्काळ एक कोटी रुपयांची आर्थिक मदत जाहीर करावी, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

तसेच या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करून न्याय मिळवून द्यावा, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# यशवंतराव चव्हाण एक सुसंस्कृत नेतृत्त्व -प्राचार्य संजय पाटील शेळगावकर

**नांदेड (प्रतिनिधी)–** यशवंतराव चव्हाण एक सुसंस्कृत नेतृत्त्व होते, असे प्रतिपादन प्राचार्य संजय पाटील शेळगावकर यांनी केले.

संत ज्ञानेश्वर विद्यालय धुप्पा येथे यशवंतराव चव्हाण यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी ते बोलत होते.

धुप्पा तालुका नायगाव येथील संत ज्ञानेश्वर विद्यालयात सोमवारी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी यशवंतराव चव्हाण यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेल्या राष्ट्रनिर्माणासाठी केलेले कार्य विविध क्षेत्रातील जसे की, औद्योगिक,कृषी, शिक्षण, EBC शिष्यवृत्ती, मराठीचा विश्वकोश निर्मितीचे काम अशा अनेक लोकोपयोगी कार्यावर प्रकाश टाकण्यात आला. त्यांच्या कार्याची नोंद घेऊन तत्कालीन सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्काराने देखील सन्मानित केले. महाराष्ट्राच्या राजकारणातील एक अत्यंत अभ्यासू सेवाभावी समर्पित त्यागी आणि एक अत्यंत सुसंस्कृत नेतृत्व म्हणून गौरवपर उल्लेख संस्थेचे सचिव प्राचार्य संजय पाटील शेळगावकर यांनी केला.

यावेळी प्राचार्य सरोज पाटील शेळगावकर, प्रा. कदम, प्राध्यापक अशोक उल्ले, रावसाहेब ताटे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मारुती हिमगिरी यांनी केले.

# प्रभाग दोनच्या विकास कामात दुसऱ्या प्रभागाच्या नगरसेवकाचा खोडा

## नगरसेवकांविरुद्ध स्थानिक नागरिकांत संताप

**भोकर (प्रतिनिधी)–** भोकर नगर परिषदेत सध्या भाजपची एकहाती सत्ता असून, शहराच्या प्रलंबित विकासकामांना गतीने सुरुवात करण्यात आली आहे. मात्र, शहराचा विकास होत असतानाच काही अपक्ष नगरसेवकांनी यात राजकीय खोडा घालण्यास सुरुवात केली आहे.

प्रभाग क्रमांक २ मधील बोरगाव रोड लगतच्या सोनटक्के कॉलनी येथे सुरू असलेल्या विद्युत खांबांच्या कामात, इतर प्रभागातील अपक्ष नगरसेवकांनी हस्तक्षेप करत काम बंद पाडल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे.

लाईट विभाग व नगर परिषदेने प्रभाग क्रमांक दोनमधील सोनटक्के कॉलनी परिसरात नवीन लाईट पोल उभारणी आणि केबल ओढण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले होते. या भागात पथदिवे नसल्यामुळे नागरिक अनेक वर्षांपासून अंधाराचा सामना करत होते. स्थानिक नागरिक शरद कनोजवार यांच्या पाठपुराव्यामुळे प्रशासकीय स्तरावर ही कामे मार्गी लागत असतानाच काही अपक्ष नगरसेवकांनी घटनास्थळी धाव घेतली.

आमच्या नातलगांच्या घरासमोर पोल का उभी करता? असा अजब तर्क, वितर्क लावत या अपक्ष नगरसेवकांनी सुरू असलेले काम बंद पाडले. यावेळी उपस्थित असलेल्या लाईट विभागाच्या अधिकाऱ्यांशी, कर्मचाऱ्यांशी आणि कंत्राटदाराच्या कामगारांशी या नगरसेवकांनी जोरदार हुज्जत घातली.

नगरसेवकांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे आणि कामात वारंवार येणाऱ्या अडथळ्यामुळे अखेर हतबल होऊन कंत्राटदाराने काम थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. कित्येक वर्षांच्या पाठपुराव्यानंतर मंजूर झालेले हे महत्त्वाचे काम वैयक्तिक आणि राजकीय कारणास्तव थांबवण्यात आल्याने रहिवाशांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

# स्वारातीम विद्यापीठात यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षामध्ये यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड, डॉ. पी. विठ्ठल, उपकुलसचिव डॉ. रवि सरोदे, कार्यकारी अभियंता तानाजी हुस्सेकर, सहा.कुलसचिव रवी मोहरीर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख कौशल्ये देण्यासाठी इंदिरा पॉलिटेक्निकचा पुढाकार

**नांदेड (प्रतिनिधी)–** विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख कौशल्ये देण्यासाठी सहयोग सेवाभावी संस्थेच्या इंदिरा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पॉलिटेक्निक, विष्णुपुरी, नांदेड या संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि उद्योगाभिमुख कौशल्ये प्राप्त व्हावीत या उद्देशाने एक महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला आहे.



या पार्श्वभूमीवर पुणे येथील पीएचएन टेक्नॉलॉजी प्रा. लि. या नामांकित तंत्रज्ञान कंपनीसोबत सामंजस्य करार करण्यात आला असून, महाविद्यालयात अत्याधुनिक टेक्नॉलॉजी लॅब स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या करारा अंतर्गत महाविद्यालयाच्या परिसरात अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रयोगशाळा उभारण्यात येणार आहे. या प्रयोगशाळेमध्ये विद्यार्थ्यांना आधुनिक व उदयोन्मुख तंत्रज्ञान विषयांवर प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणार आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञानापुरते मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष प्रकल्पांवर काम करण्याची आणि आधुनिक उपकरणांच्या साहाय्याने प्रयोग करण्याची संधी मिळणार आहे.

पीएचएन टेक्नॉलॉजी प्रा. लि.च्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी विविध अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम, कौशल्य विकास प्रशिक्षण, तांत्रिक कार्यशाळा, सेमिनार तसेच फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील संस्थांशी संलग्न प्रमाणपत्र अभ्यासक्रमांची संधी उपलब्ध होणार आहे. इच्छुक विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्राशी संबंधित इंटर्नशिप, लाइव्ह प्रोजेक्ट्स तसेच तज्ज्ञांचे मार्गदर्शन देखील मिळणार आहे.

या तंत्रज्ञान प्रयोगशाळेमुळे विद्यार्थ्यांना उद्योगाच्या गरजे-नुसार आवश्यक असलेली कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळणार असून, त्यांची रोजगारक्षमता वाढण्यास मोठी मदत होणार आहे. बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांना अद्ययावत ज्ञान व कौशल्ये देण्यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरणार असल्याचे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

या सामंजस्य कराराच्या कार्यक्रमास सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ. संतुकराव हंबर्डे, प्राचार्य डॉ. ईशान अग्रवाल, प्राचार्य शिवानंद बारसे पीएचएन टेक्नॉलॉजी प्रा. लि. च्या प्रतिनिधी हर्षदा जोंधळे उपस्थित होते. पीएचएन प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होणाऱ्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमांची माहिती देत उद्योग-शिक्षण सहकार्याचे महत्त्व स्पष्ट केले.

पुढील शैक्षणिक वर्षापासून ही टेक्नॉलॉजी लॅब कार्यान्वित होणार असून विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

# महिला दिनानिमित्त महिला महाविद्यालयात आरोग्य शिबीर




**नांदेड (प्रतिनिधी)–** जागतिक महिला दिनानिमित्त के.आर. एम. महिला महाविद्यालयात महिला आरोग्य शिबीर नुकतेच संपन्न झाले. महिलांचे आरोग्य निरोगी व सुदृढ राहण्यासाठी वर्षातून एकदा तरी आरोग्याची संपूर्ण तपासणी करणे आवश्यक असते. आरोग्य शिबिरात तपासणी केल्यामुळे आयुष्यात पुढे होणारे आजार आधीच समजून त्यावर योग्य ते उपचार वेळीच करता येतात. या दृष्टिकोनातून गेल्या २१ वर्षापासून महिला महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात येते.

स्त्री कुटुंबाचा आधारस्तंभ असते, त्यामुळे तिचे आरोग्य निरोगी राहण्यासाठी तपासणीची आवश्यकता महिलांमध्ये रुजवून असे शिबीर ८ व ९ मार्च या दोन दिवसांमध्ये घेतले. या शिबिरासाठी फिजिशियन म्हणून डॉ. सारिका देशपांडे श्री हॉस्पिटल, स्त्री रोग तज्ज्ञ म्हणून कल्पना खानापुरे, त्वचारोग तज्ज्ञ डॉ. ज्योती कुलकर्णी आणि सोनोग्राफी तज्ज्ञ डॉ. कीर्ती साखरे यांचे सहकार्य लाभले. या आरोग्य शिबिरासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विजयालक्ष्मी देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी डॉ. मेधा धर्मापुरीकर, डॉ. शोभा इंगळे आणि प्रा. सुनिता कामळजकर यांनी परिश्रम घेतले. या शिबिरामध्ये अनेक महिलांनी आपला सहभाग नोंदवला.

फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी

# मॅट लिपस्टिक ओठांवरून निघत नसेल तर वापरा या सोप्या टिप्स...



**ओठांना लिपस्टिक लावल्यानंतर लुकमध्ये एक वेगळाच चार्म येतो. इतर मेकअप करत बसण्यापेक्षा अनेक महिला केवळ लिपस्टिक लावण्याला पसंती देतात. त्यातही ग्लॉसी, शिमरी अथवा अन्य लिपस्टिकपेक्षा मॅट लिपस्टिकला अधिक मागणी असते. ही लिपस्टिक ओठांवर अधिक काळ टिकते. पण मॅट लिपस्टिक काढताना मात्र महिलांना काही ब्रँड्सच्या बाबतीत खूपच त्रास होतो आणि ओठ काळे पडण्याचीही भीती असते. मग अशावेळी नक्की काय करावे आणि कसा त्रास होणार नाही याच्या काही सोप्या टिप्स. हा घरगुती उपाय करून तुम्ही तुमचे ओठ नैसर्गिक सुंदर ठेवण्यास मदत करू शकता.**

- नारळाचे तेल सोपा उपाय : प्रत्येकाच्या घरात नारळाचे तेल हे असतंच. तुम्हाला मेकअप रिमूव्हल मिळत नसेल तर नारळाचे तेल हा सोपा उपाय आहे. मॅट लिपस्टिक ओठांवरून काढण्यासाठी मेकअप रिमूव्हरदेखील कधी कधी अपयशी ठरते. पण यावर नारळाचे तेल अधिक गुणकारी ठरते. कापसावर नारळाचे तेल घ्या आणि मॅट लिपस्टिक ओठांवरून काढा. हे कोणताही त्रास न घेता पटकन लिपस्टिक काढण्यास फायदेशीर ठरते आणि त्याशिवाय नारळाच्या तेलाने ओठांना पोषणही मिळते.



- क्रिमी लिप बाम : मॅट लिपस्टिक काढण्यासाठी तुम्ही ओठांवर कोणत्याही पद्धतीचा क्रिमी लिप बाम लावू शकता. इतकंच नाही तर तुम्ही ब्रँडेड मॉईस्चराईजरचा वापर करूनही ही लिपस्टिक काढू शकता. हे क्रिमी लिप बाम लावा आणि मग मुलायम कपड्याने हलक्या हाताने ओठ पुसा. ओठांवरील लिपस्टिक पटकन निघून जाण्यास मदत मिळते.
- टूथब्रशची घ्या मदत : ओठांवरून लिपस्टिक काढल्यानंतरही बरेचदा मॅट लिपस्टिकचे डाग ओठांवर राहिलेले दिसून येतात. हे डाग काढण्यासाठी तुम्ही टूथ ब्रशची मदत घेऊ शकता. सॉफ्ट टूथब्रशच्या सहाय्याने तुम्ही हे डाग स्वच्छ करा. म्हणजे ओठ काळे पडणार नाहीत. तसंच टूथब्रशचा वापर केल्याने ओठ एक्सफोलिएटही होतात. हे करून झाल्यावर तुम्ही ओठांना हायड्रेटेड लिप बाम नक्की लावा.
- मॅट लिपस्टिकपूर्वी लावा लिप बाम : तुमची मॅट लिपस्टिक अधिक काळ टिकणारी असेल आणि लवकर निघत नसेल तर अशी शेड लावण्यापूर्वी तुम्ही ओठांना लिप बाम लावणे गरजेचे आहे. असे केल्याने ओठ मुलायम राहतील आणि लिपस्टिक काढतानाही त्रास होणार नाही. तसंच रात्री झोपण्यापूर्वी मेकअप काढणे अधिक गरजेचे असते. यासाठी तुम्हाला ओठ रगडावे लागणार नाहीत.
- ऑलिव्ह ऑईलही ठरते उपयोगी : नारळाच्या तेलाप्रमाणेच तुम्ही ऑलिव्ह ऑईलचाही उपयोग करून घेऊ शकता. नैसर्गिक तेल असल्याने तुमचे ओठ काळे पडणार नाहीत आणि मॅट लिपस्टिक लवकर निघण्यास याची मदत मिळेल. लिपस्टिक घालविण्यासाठी ओठ रगडणे योग्य नाही. ओठांना यामुळे नुकसान पोहचू शकते.



## तमन्नाचे ब्युटी सिक्रेट...

# दोन थेंब शुद्ध तुपामुळे खुलते सौंदर्य!

**अभिनेत्री तमन्ना भाटियाने सौंदर्य आणि बिनधास्त स्वभावाने सिनेरसिकांच्या हृदयात स्वतःचे स्थान निर्माण केलंय. तिच्या चाहत्यांच्या यादीमध्ये तरुणांची संख्या सर्वाधिक आहे. विशेष म्हणजे ही अभिनेत्री स्किन केअर रुटीनमध्ये अत्यंत साध्या आणि नैसर्गिक उपचारांचा समावेश करते, यावर कोणाचाही विश्वास बसणार नाही. तमन्ना भाटिया आपल्या त्वचेचं डीप मॉइश्चराइझेन करण्यासाठी शुद्ध तूप आणि नारळाच्या तेलाचा उपयोग करते. तमन्नाचे सौंदर्य पाहिल्यानंतर ही अभिनेत्री ब्युटी पार्लरमधील महागड्या ट्रीटमेंटसाठी तास-न्-तास वेळ देत असावी, असे वाटू शकते. पण तिच्या ब्युटी केअर रुटीनमध्ये नैसर्गिक सामग्रींचा समावेश सर्वाधिक असतो. चला जाणून घेऊया तमन्ना भाटियाच्या सौंदर्याचे सीक्रेट...**

### 'कंटाळवाणे असेल पण सत्य आहे...

आपल्या चमकदार त्वचेचं सीक्रेट सांगताना तमन्नाने स्पष्ट केलं होतं की, 'मी जे काही शेअर करणार आहे, ती माहिती ऐकून तुम्हाला कदाचित कंटाळा आला असेल. पण जे सत्य आहे, तेच सांगतेय. चमकदार त्वचेचं पहिले सीक्रेट म्हणजे हाइड्रेट बॉडी. जास्तीत जास्त प्रमाणात पाणी प्या, डाएटमध्ये द्रवयुक्त पदार्थांचा समावेश करावा आणि हिरव्या भाज्यांचे नियमित सेवन करा. या सर्व गोष्टींमुळे त्वचा निरोगी राहण्यास मदत मिळते'.

### चिरतरुण राहण्यास मदत करणाऱ्या गोष्टी

त्वचा चमकदार आणि उजळ ठेवण्यास कोणत्या गोष्टींचा उपयोग करणं तुला आवडतं, हा प्रश्न देखील तमन्नाला विचारण्यात आला होता. यावर तिनं उत्तर दिलं की, मी एक अशी व्यक्ती आहे जी केमिकल प्रॉडक्ट्सच्या मदतीने सौंदर्य मिळवण्याऐवजी घरगुती-नैसर्गिक उपचार करणं अधिक पसंत करते. हळद, चंदन पावडरचा उपयोग करणं मला जास्त आवडते. यामुळे त्वचेला उत्तम लाभ देखील मिळतात.





### माझे स्किन केअर रुटीन

त्वचेची देखभाल करण्यासाठी खासच गोष्टींचा उपयोग करावा, याची काहीही आवश्यकता नाही. मी नियमित CTM फॉलो करते; म्हणजेच क्लिंझिंग, टोनिंग आणि मॉइश्चराइझेशन या अतिशय बेसिक गोष्टी आहेत. पण याद्वारे त्वचेचं झालेलं नुकसान भरून निघण्यास मदत मिळते. प्रत्येक महिलेनं दिवसभरात अशा पद्धतीने आपल्या त्वचेची देखभाल करणं गरजेचं आहे.

### लहानपणी केला होता असा मेकअप

आपल्या बालपणीचा मजेशीर किस्सा देखील तमन्नाने सांगितला होता. मी चार किंवा पाच वर्षांची असेन, जेव्हा मी पहिल्यांदा स्वतःचा मेकअप केला होता. मी आईचे मेकअप बॉक्स उघडले आणि त्यातील आयशॅडो घेतले. एका पापणीवर हिरवा आणि दुसऱ्या पापणीवर निळा रंग्याचे आयशॅडो लावलं व झोपी गेले. झोपेतून उठल्यानंतर चेहऱ्यावर टनभर मेकअप पाहून 'हिला नेमके झालंय तरी काय?' अशी माझ्या आईची प्रतिक्रिया होती.




### मी या गोष्टींशिवाय जगू शकत नाही...

तमन्ना भाटियाला विचारण्यात आले होते की, असे कोणते प्रोडक्ट आहे, ज्याच्या वापराशिवाय तू जगू शकत नाही. यावर नारळाचे तेल असे उत्तर तमन्नाने दिलं. त्वचेची देखभाल करण्यासाठी फार पूर्वीपासून नारळाचे तेल आणि शुद्ध तुपाचा वापर करणे ही आपली परंपरा आहे. या सामग्रींचा उपयोग करणं मला आवडते. या दोन्ही गोष्टी पूर्णतः हर्बल आणि सुरक्षित आहेत. तसंच त्वचेला पोषण तत्त्वांचा पुरवठा देखील होतो. शुद्ध तुपाचे दोन थेंब घेऊन त्वचेवर लावा आणि हलक्या हाताने मसाज करा. २० मिनिटांनंतर थंड पाण्याने चेहरा स्वच्छ धुऊन घ्यावा. तुम्हाला तुपाचा सुगंध आवडत नसेल तर फेस वॉशचा उपयोग करावा. पण हा उपाय करण्यापूर्वी आपल्या ओळखीच्या डॉक्टरांचा सल्ला घ्यायला विसरू नका.

# कोथिंबीरीची पेस्ट लावल्याने त्वचा होते चमकदार!



**स्वयंपाकाची चव वाढवण्यासाठी कोथिंबिरीचा उपयोग आवर्जून केला जातो. कोथिंबिरीच्या चटणीशिवाय कांदा-बटाटा भजी खाण्याची मजाच येत नाही. पण स्वयंपाकाव्यतिरिक्त कोथिंबिरीचा स्किन केअर रुटीनमध्येही समावेश केला जाऊ शकतो, हे तुम्हाला माहिती आहे का? त्वचेची स्वच्छता करण्यासाठी, चेहरा चमकदार दिसण्यासाठीही कोथिंबिरीचा वापर करता येतो. कोथिबिंरीच्या फेस पॅकमुळे सुरकुत्या, मुरुम इत्यादी समस्या दूर होण्यास मदत मिळते. कोथिंबिरीतील औषधी घटकांमुळे त्वचेवरील मृत पेशींची समस्या दूर होते. तसंच त्वचेतील नवीन पेशींची निर्मिती होण्यासही मदत मिळते. जाणून घेऊया कोथिंबिरीचे फेस पॅक कसे तयार करायचे?**

### कोथिंबिरीचे फेस पॅक तयार करण्याची पद्धत

सामग्री : कोथिंबिरीची ताजी जुडी (आवश्यकतेनुसार), एक मोठा चमचा ताजे दही, एक चमचा बेसन. सर्वप्रथम कोथिंबिरीची पाने निवडा आणि मिक्सरच्या भांड्यामध्ये वाटून त्याची पेस्ट तयार करा. कोथिंबीर त्वचेसाठी अतिशय उपयुक्त मानली जाते. यामध्ये व्हिटॅमिन सी, अँटी-बॅक्टेरियल, अँटी-ऑक्सिडंट आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात. यामुळे त्वचा निरोगी राहते. तसंच वृद्धत्वाची समस्या आणि चेहऱ्यावरील डाग देखील कमी होतात. यातील पोषक घटकांमुळे सनबर्नची समस्या दूर होऊन त्वचेतील ओलावाही टिकवून ठेवण्याचे कार्य करतात.

### फेस पॅक एक पण फायदे अनेक

कोथिंबिरीची पेस्ट एक स्वच्छ वाटीमध्ये काढा. यामध्ये एक चमचा दही मिक्स करा. दह्यामध्ये लॅक्टिक ॲसिड असते. यामुळे त्वचेवरील मृत पेशी काढण्यास मदत मिळते. तसंच त्वचेसाठी उपयुक्त असणाऱ्या फॅटी ॲसिड, प्रोटीन, व्हिटॅमिन आणि खनिजांचाही दह्यामध्ये मोठा साठा आहे. सर्वात शेवटी यामध्ये एक चमचा बेसन मिक्स करा. बेसनमुळे त्वचेवरील अतिरिक्त तेल कमी होण्यास मदत मिळते. यामुळे चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येते. घट्ट पेस्ट तयार होईपर्यंत मिश्रण ढवळत राहा. फेस पॅक तयार झाल्यानंतर मान आणि चेहऱ्यावर लावा.

### टॅनिंग, जळजळ, लालसरपणा

कोथिंबिरीमध्ये अँटी- बॅक्टेरिअल, अँटी- सेप्टिक, अँटी- फंगल आणि अँटी- इंफ्लेमेटरी गुणधर्म भरपूर प्रमाणात असतात. कोथिंबिरीचे फेस पॅक लावल्यास त्वचेवर जळजळ होणे, त्वचा लाल होणे, त्वचेला खाज होणे या समस्या कमी होण्यास मदत मिळते. उन्हाळ्यात बहुतांश जणांना टॅनिंगच्या समस्येचा सामना करावा लागतो. त्वचेला थंडावा मिळावा आणि त्वचा नैसर्गिक स्वरुपात उजळावी यासाठी आपण कोथिंबिरीच्या पेस्टचा उपयोग करू शकता.



### त्वचेला मिळतील दुप्पट फायदे

या फेस पॅकमुळे चेहऱ्याला थंडावा मिळेल. मुरुम, डार्क सर्कल, डाग, सनबर्न इत्यादी त्वचेशी संबंधित समस्या दूर होण्यास मदत मिळेल. हवे असल्यास आपण यामध्ये गुलाब पाणी देखील मिक्स करू शकता. या फेस पॅकमुळे त्वचेला खोलवर पोषण तत्त्वांचा पुरवठा होतो.

### त्वचा राहील चिरतरुण

पॅक सुकल्यानंतर आपला चेहरा थंड पाण्याने स्वच्छ धुऊन घ्यावा. आठवड्यातून दोन ते तीन वेळा या फेस पॅकचा उपयोग करावा. पार्टीमध्ये जाण्यापूर्वी पार्लरमधील महागडी केमिकल ट्रीटमेंट करण्याऐवजी या होममेड फेस पॅकचा उपयोग करून पाहा. यामुळे चेहऱ्याची त्वचा मऊ होईल आणि त्वचा सैल देखील पडणार नाही.

# फळांच्या मदतीने घरीच करा बॉडी पॉलिशिंग!



**बदलत्या ऋतूनुसार आपल्या त्वचेची देखभाल करणं देखील अत्यंत गरजेचं असते. फेस पॅक, स्क्रबिंग यासह बॉडी पॉलिशिंग केल्यासही त्वचेला भरपूर लाभ मिळतील. आयुर्वेदिक - नैसर्गिक सामग्रींचा उपयोग करून घरच्या घरी बॉडी पॉलिशिंग केल्यास त्वचेवरील मृत पेशी, टॅनिंग यासारख्या समस्या हळूहळू दूर होण्यास मदत मिळते. घरच्या घरी बॉडी पॉलिशिंग करण्यासाठी आवश्यक असणारी सामग्री म्हणजे पिकलेली पपई. या फळातील औषधी गुणधर्मामुळे त्वचेशी संबंधित समस्या कमी होण्यास मदत मिळेल. केवळ खबरदारी म्हणून हा उपाय करण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. कारण प्रत्येकाच्या त्वचेचा प्रकार एकसारखा नसतो. चला तर जाणून घेऊया सविस्तर माहिती...**

- बॉडी पॉलिशिंग क्रीम तयार करण्यासाठी लागणारी सामग्री : घरच्या घरी हर्बल बॉडी पॉलिशिंग क्रीम तयार करण्याची ही पद्धत अतिशय सोपी आणि प्रभावी आहे. ही क्रीम आपण एक आठवड्यापर्यंत फ्रीजमध्ये स्टोअर करून ठेवू शकता. सामग्री : पिकलेली पपई, बेसन, ऑलिव्ह ऑइल, मध, साखर. पॉलिशिंग क्रीम तयार करण्याची पद्धत : सर्व प्रथम पिकलेल्या पपईची एक मोठे स्लाइस घ्या. त्यावरील साल काढा आणि छोट्या आकारात पपई कापून मॅश करा. ही पेस्ट वेगळ्या वाटीमध्ये ठेवून द्या. यानंतर दुसऱ्यामध्ये वाटीमध्ये चार ते पाच चमचे साखर, दोन चमचे मध, तीन चमचे बेसन, दोन चमचे ऑलिव्ह ऑइल एकत्र घ्या. सर्व सामग्री नीट मिक्स करा. क्रीमप्रमाणे पेस्ट तयार होईपर्यंत पपईची प्युरी त्यामध्ये मिक्स करत राहा.
- कसा करावा क्रीमचा वापर : बॉडी पॉलिशिंग करण्यापूर्वी आंघोळ करणं आवश्यक आहे. जेणेकरून त्वचेवर जमा झालेले अतिरिक्त तेल आणि दुर्गंध स्वच्छ होईल. आंघोळ केल्यानंतर टॉवेलनं शरीर पुसून घ्या आणि बॉडी पॉलिशिंग क्रीम लावा. हे क्रीम लावल्यानंतर प्रत्येक अवयवाचा दोन मिनिटांसाठी मसाज करावा. यामुळे त्वचेला पोषण तत्त्वांचा पुरवठा होण्यास मदत मिळेल.
- त्वचेवर किती वेळ लावून ठेवावं क्रीम? : मसाज केल्यानंतर कमीत कमी १० मिनिटांसाठी क्रीम त्वचेवर लावून ठेवा. यानंतर टिश्यू पेपरच्या मदतीने त्वचा स्वच्छ करून घ्या. हवे असल्यास आपण आंघोळ देखील करू शकता. यानंतर संपूर्ण शरीरावर चांगले मॉइश्चराइझर किंवा कोरफड जेल लावणे आवश्यक आहे.
- त्वचेवर नैसर्गिकरित्या येईल तेज : हे बॉडी पॉलिशिंग क्रीम पूर्णतः हर्बल आहे. यामुळे तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार आपण नियमित हा उपाय करू शकता. आठवड्यातून एकदा किंवा तिनदा आपण हा उपाय करावा. या क्रीममधील सर्व सामग्री नैसर्गिक असल्याने त्वचेला उत्तम लाभ मिळतात. केमिकलयुक्त ट्रीटमेंट करण्याऐवजी आयुर्वेदिक उपचारांचा स्किन केअर रुटीनमध्ये समावेश केल्यास दीर्घकाळासाठी लाभ मिळतील.

# चेहऱ्याच्या त्वचेची अशी होईल खोलवर स्वच्छता!

**टॅनिंग कमी करण्यासाठी आणि उन्हाळ्यात त्वचेवर नैसर्गिक चमक यावी, यासाठी बडिशेप अत्यंत उपयुक्त ठरू शकते. यातील औषधी गुणधर्मामुळे त्वचेला थंडावा मिळतो आणि त्वचेतील पेशींची निर्मिती देखील जलदगतीने होण्यास मदत मिळते. बडिशेपच्या सुगंधामुळे मन आणि मेंदूला शांतता लाभते. या सुगंधामुळे तणाव कमी होतो. यातील औषधी गुणधर्मामुळे त्वचेचं सौंदर्य नैसर्गिकरित्या खुलते. तसंच मर्यादित स्वरुपात बडिशेपचे सेवन केल्यास पचनक्रिया देखील सुरळीत सुरू राहते. यामुळेच तन-मन आणि मेंदू या तिन्हीसाठी बडिशेप लाभदायक आहे.**

बडिशेपपासून अँटी-एजिंग फेस पॅक तयार करण्यासाठी लागणारी सर्व सामग्री तुमच्या स्वयंपाकघरात उपलब्ध असेलच. जाणून घेऊया पद्धत... साहित्य : चार चमचे बडिशेप, एक पिकलेले केळे, एक चमचा मध, गुलाब पाणी. सर्वप्रथम मिक्सरच्या भांड्यामध्ये बडिशेप वाटा आणि पावडर तयार करा. आपण एकाच वेळेस जास्त प्रमाणात पावडर तयार करून स्टोअर करू शकता. यानंतर टी-बॅग एक कप गरम पाण्यात बुडवून ठेवा. यानंतर केळ्याची साल काढा आणि केळे मॅश करा. मॅश केलेले केळे एका मोठ्या वाटीमध्ये घ्या आणि यामध्ये चार चमचे बडिशेपची पावडर मिक्स करा. यानंतर एक चमचा मध आणि गुलाब पाणी देखील मिक्स करावे. लेप तयार झाल्यानंतर चेहरा आणि मानेवर लावा. तसंच टी बॅग हलकीशी पिळा आणि २० मिनिटांसाठी डोळ्यांवर ठेवा. (टी-बॅग जास्त प्रमाणात गरम नसावी, हे कायम लक्षात ठेवा) पॅक लावून २० ते २५ मिनिटे झाल्यानंतर आपण चेहरा स्वच्छ करू शकता. यासाठी सर्वप्रथम डोळ्यांवरून टी बॅग काढा. चेहऱ्यावर पाणी शिंपडावे आणि गोलाकार दिशेने हलक्या हाताने त्वचेचा मसाज करून पेस्ट काढावी. असे केल्यास चेहऱ्यावरील डेड स्किनची समस्या दूर होऊन त्वचेची खोलवर स्वच्छता होण्यास मदत मिळेल. चेहरा पाण्याने स्वच्छ धुतल्यानंतर टॉवेलने पुसून घ्यावा. यानंतर कापसाच्या मदतीने चेहऱ्यावर गुलाब पाणी लावावे. गुलाब पाणी आपल्या चेहऱ्यावर स्किन टोनरप्रमाणे कार्य करते. यामुळे रोमछिद्रांमधील दुर्गंध स्वच्छ होण्यास मदत मिळते. तसंच त्वचेची खोलवर स्वच्छ देखील होते.

# उन्हाळी सुट्टीनिमित्त पुण्यातून धावणार ३३४ विशेष ट्रेन

**पुणे (प्रतिनिधी)** – परीक्षा संपली की वेध लागतात ते सुट्टीचे, बाहेरगावी फिरायला जायचे, त्यामुळे उन्हाळ्यात रेल्वेवर प्रवाशांचा बोजा मोठ्या प्रमाणात वाढतो, हाच बोजा कमी करण्यासाठी आणि प्रवाश्यांचा प्रवास सुखकर करण्यासाठी पुणे रेल्वे विभागाने एक आनंदाची बातमी प्रवाशांना दिली आहे.



या विशेष गाड्यांमध्ये पुणे ते दानापूर मार्गावरील दैनिक विशेष गाडीच्या सर्वाधिक २१२ फेऱ्यांचा समावेश आहे. गाडी क्रमांक ०१४४९ ही विशेष गाडी १ एप्रिल ते १५ जुलै दरम्यान दररोज पुणे येथून सुटणार आहे. तर गाडी क्रमांक ०१४५० ही गाडी ३ एप्रिल ते १७ जुलै या कालावधीत दररोज दानापूर येथून पुण्याकडे धावणार आहे.

याशिवाय पुणे ते नागपूर दरम्यान साप्ताहिक सुपरफास्ट विशेष गाड्यांचेही नियोजन करण्यात आले आहे. या मार्गावर एकूण ५३ फेऱ्या होणार आहेत. गाडी क्रमांक ०१४६९ ही गाडी २१ एप्रिल ते १४ जुलै दरम्यान प्रत्येक मंगळवारी पुणे येथून सुटेल, तर गाडी क्रमांक ०१४७० ही गाडी २२ एप्रिल ते १५ जुलै दरम्यान दर बुधवारी नागपूर येथून धावणार आहे.

त्याचबरोबर पुणे ते नागपूर मार्गावर आणखी एका विशेष गाडीचीही व्यवस्था करण्यात आली आहे. गाडी क्रमांक ०१४५७ ही १५ एप्रिल ते १५ जुलै दरम्यान दर बुधवारी पुणे येथून सुटणार असून गाडी क्रमांक ०१४५८ ही १६ एप्रिल ते १६ जुलै दरम्यान दर गुरुवारी नागपूरहून धावणार आहे. या गाडीच्या एकूण २८ फेऱ्या नियोजित करण्यात आल्या आहेत.

पुणे ते गाझीपूर सिटी दरम्यान द्विसाप्ताहिक विशेष गाडीही चालवली जाणार आहे. या मार्गावर एकूण आठ फेऱ्या असतील. गाडी क्रमांक ०१४३१ ही गाडी १७ ते २८ एप्रिल दरम्यान मंगळवार आणि शुक्रवार या दिवशी पुणे येथून सुटेल, तर गाडी क्रमांक ०१४३२ ही गाडी १९ ते ३० एप्रिल दरम्यान रविवार आणि गुरुवारी गाझीपूर सिटी येथून धावणार आहे.

उन्हाळी सुट्ट्यांमध्ये उत्तर भारताकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असते. त्यामुळे या अतिरिक्त गाड्यांमुळे प्रवाशांना आरक्षण मिळणे सोपे होईल तसेच रेल्वेतील गर्दी कमी करण्यास मदत होईल, अशी अपेक्षा रेल्वे प्रशासनाने व्यक्त केली आहे.

# योजना असतानाही रुग्णांकडून पैसे घेणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई करणार – आरोग्यमंत्री

**मुंबई (प्रतिनिधी)** – महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना लागू असतानाही रुग्णांकडून पैसे घेणाऱ्या रुग्णालयांवर शासनाकडून कारवाई करण्यात येत असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत दिली. योजनांमध्ये पारदर्शकता वाढवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय.) आधारित यंत्रणेचा वापरही करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

या संदर्भात सदस्य नाना पटोले यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता. या चर्चेत सुनिल प्रभू, बबनराव लोणीकर आणि रत्नाकर गुट्टे यांनी सहभाग घेतला. मंत्री आबिटकर म्हणाले की, काही रुग्णालयांकडून अनियमितता झाल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारींची दखल घेत राज्यात ३३८ प्रकरणांमध्ये एकूण सुमारे ६०.४७ लाख रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

अकोला जिल्ह्यातील एका खासगी रुग्णालयाविरुद्ध योजना लागू असतानाही तपासण्या व शस्त्रक्रियांसाठी रुग्णांकडून पैसे घेतल्याच्या एकूण १२ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. राज्य आरोग्य हमी सोसायटीने केलेल्या चौकशीनुसार एका रुग्णास घेतलेले पैसे परत करण्यात आले असून संबंधित रुग्णालयावर नियमानुसार दंडात्मक कारवाई प्रस्तावित आहे. उर्वरित ११ तक्रारींच्या संदर्भात संबंधित रुग्णालयांना नोटिसा बजावण्यात आल्या असून चौकशी सुरू आहे. राज्यात महात्मा फुले जन आरोग्य योजनेमध्ये आयुष्मान भारत योजना समाविष्ट केल्यानंतर उपचारासाठी समाविष्ट आजारांची संख्या वाढविण्यात आली असून त्यानुसार उपचार पॅकेजेसमध्येही वाढ करण्यात आली आहे. योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी एआय,च्या माध्यमातून तक्रारींचे परीक्षण करून तत्काळ कारवाई केली जात असल्याचेही मंत्री आबिटकर यांनी सांगितले.

तसेच योजनांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी लोकप्रतिनिधींच्या सहभागातून समिती स्थापन करण्यात आली असून पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली दर तीन महिन्यांनी जिल्हास्तरावर आढावा बैठक घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

योजनेंतर्गत रुग्णांकडून अतिरिक्त पैसे घेतल्याचे आढळल्यास संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्यात येईल. वारंवार चुका करणाऱ्या रुग्णालयांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याची कार्यवाहीही करण्यात येईल, असेही मंत्री आबिटकर यांनी स्पष्ट केले.

# बोगस प्रमाणपत्र प्रकरणी हिंगोलीतील शाळेविरुद्ध फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश – अतुल सावे

**मुंबई (प्रतिनिधी)** – हिंगोली जिल्ह्यातील विद्या शक्ती शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मराठी माध्यमाच्या शाळेने चुकीची माहिती देऊन शासनाकडे बनावट प्रमाणपत्र सादर केल्याचा प्रकार उघडकीस आला असून संबंधित शाळेविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी विधानसभेत दिली.

हिंगोली जिल्ह्यातील विद्या शक्ती शिक्षण प्रसारक मंडळ संचलित लखन सर्जेराव नाईक इंग्लिश स्कूल, कोळसा शाळाही मराठी माध्यमाची असताना इंग्रजी माध्यम सुरू केल्यासंदर्भात सदस्य तानाजी मुटकुळे यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्याला इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी उत्तर दिले. या चर्चेत सदस्य बाबासाहेब देशमुख, प्रशांत बंब, संजय कुटे यांनी सहभाग घेतला. मंत्री सावे म्हणाले, की इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राजे यशवंतराव होळकर इंग्रजी माध्यम निवासी शाळा योजना चालवली जाते. संबंधित संस्थेने मराठी माध्यमाची शाळा इंग्रजी माध्यमाची असल्याचे दाखवत कागदपत्रांमध्ये खाडाखोड करून प्रमाणपत्र सादर केले होते. याबाबत तक्रार आल्यानंतर विभागाने तपासणी केली. तपासणीत विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत मोठी तफावत आढळली. या प्रकरणी संबंधित शाळेला नोटीस देण्यात आली असून इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या आयुक्तालयातील सनदी अधिकाऱ्यांच्या माध्यमातून सखोल चौकशी करण्यात येईल. चौकशीअंती शाळेची मान्यता रद्द करण्यासह बोगस प्रमाणपत्र देऊन घेतलेला शासनाचा निधी वसूल केला जाईल आणि फौजदारी गुन्हाही दाखल केला जाईल, असे मंत्री सावे यांनी स्पष्ट केले. या प्रकरणात दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कारवाई केली जाईल. आयुक्तालयाच्या संचालकांना १५ दिवसांत चौकशी पूर्ण करून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचे मंत्री सावे यांनी सांगितले. संबंधित शाळेत शिकणारे विद्यार्थी असल्यास त्यांना हिंगोली जिल्ह्यातील दुसऱ्या इंग्रजी माध्यम निवासी शाळेत स्थलांतरित करण्याची व्यवस्था करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## बायपास शस्त्रक्रियेसाठी विशेष योजना, एक रुपयाही द्यायची गरज नाही – आरोग्यमंत्री

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील रुग्णालयांमध्ये अनेकांना महात्मा फुले आरोग्य योजनेचा व्यवस्थितपणे लाभ मिळत नसल्याचा मुद्दा सोमवारी भाजपचे आमदार बबनराव लोणीकर यांनी सभागृहात उपस्थित केला. यावेळी लोणीकर यांनी शिवसेनेचे आमदार आणि आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांना जाब विचारला. आमच्या मतदारसंघातील एका व्यक्तीला बायपासच्या शस्त्रक्रियेसाठी महात्मा फुले योजनाआणि आयुषमान भारत योजनेचालाभ मिळत नाही. योजनेच्या निकषापेक्षा त्या व्यक्तीला कमी पैसे मिळत असल्याची तक्रार बबनराव लोणीकर यांनी केली. यावर आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी मला महात्मा फुले आरोग्य योजनेच्या निकषांचे पालन न करणाऱ्या रुग्णालयांचे नाव सांगावे. मी तात्काळ त्यांच्यावर कारवाई करतो, असे आश्वासन दिले.

आमदार बबनराव लोणीकर यांनी सभागृहात हा मुद्दा जोरकसपणे लावून धरला. मंत्री महोदय आपल्या विभागाचे काम चांगले होत आहे. पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री महोदयांनी या देशातील राज्यातील आणि देशातील १०० कोटी लोकांसाठी आयुषमान भारत योजना आणली आहे. राज्य सरकारने महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी योजना आणली आहे. या दोन्ही योजना एकत्र आहेत. आमचे विठ्ठल कदम नावाचे शेतकरी आहेत. त्यांची बायपास शस्त्रक्रिया करायी आहे. या शस्त्रक्रियेसाठी एका व्यक्तीला ११ लाख रुपये लागतात. सहा लाख रुपये केंद्र आणि राज्य सरकारकडून बायपासच्या शस्त्रक्रियेसाठी दिले जातात. पण त्यांना फक्त १ लाख रुपये मिळत आहेत. बायपासला एक लाख रुपयात होत नाही, दोन महिन्यांपासून ऑपरेशन थांबले आहे. त्याच्यामुळे केंद्राचे ३ लाख आणि राज्याचे ३ लाख असतानाही फक्त विठ्ठल कदम यांना एक लाख रुपये मंजूर करु, असे सांगितले आहे. त्यामुळे सहा लाख रुपये या लाभार्थ्यांना देणार का, असा प्रश्न बबनराव लोणीकर यांनी उपस्थित केला.

## छत्रपती संभाजीनगर पाणीपुरवठा प्रकल्प डिसेंबर २०२६ पर्यंत कार्यान्वित होणार

**मुंबई (प्रतिनिधी)** – छत्रपती संभाजीनगर शहरातील पाणीपुरवठा प्रकल्पाचे ८३ टक्के काम झाले असून उर्वरित कामे पूर्ण करून डिसेंबर २०२६ अखेर हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याचे नियोजन असल्याचे मंत्री उदय सामंत यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

याबाबत सदस्य विक्रम काळे यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला. मंत्री डॉ. उदय सामंत म्हणाले, प्रकल्पाच्या अंमलबजावणीत पर्यावरण विभागाच्या परवानग्या, स्थानिक पातळीवरील अडचणी तसेच जलकुंभासाठी जागा उपलब्ध होण्यात आलेल्या तांत्रिक अडचणींमुळे कामाला विलंब झाला. तथापि, प्रकल्पाचे काम सध्या सुरू आहे. पूर्वी काही भागांमध्ये नागरिकांना १० ते १२ दिवसांनी पाणी मिळत होते, मात्र सध्या पाच ते सहा दिवसांनी पाणीपुरवठा होत आहे. प्रकल्पासाठी निधी उपलब्धतेबाबत शासन सकारात्मक असून महानगरपालिकेच्या स्वहिश्याचा निधी कर्जस्वरूपात उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच राज्य शासनाकडूनही प्रकल्पाच्या प्रगतीचा नियमित आढावा घेतला जात असल्याचे मंत्री सामंत यांनी यावेळी स्पष्ट केले.

# अनधिकृत नर्सिंग होमवर कारवाईसाठी लवकरच टास्क फोर्सची स्थापना

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील अनधिकृत आणि विनानोंदणी सुरू असलेल्या नर्सिंग होमवर कारवाई करण्यासाठी टास्क फोर्स स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती मंत्री डॉ. उदय सामंत यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

याबाबत सदस्य चित्रा वाघ यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य भाई जगताप, संजय खोडके, सचिन अहिर यांनी उपप्रश्न उपस्थित केला. मंत्री डॉ. उदय सामंत म्हणाले, महाराष्ट्र शुश्रूषा नोंदणी अधिनियम, १९४९ तसेच संबंधित नियमांनुसार राज्यात खासगी रुग्णालये आणि नर्सिंग होमची नोंदणी व तपासणी केली जाते.मात्र काही ठिकाणी विनानोंदणी किंवा अनधिकृत नर्सिंग होम सुरू असल्याच्या तक्रारी येत असल्याने या प्रकरणावर राज्यस्तरावर समन्वयाने कारवाई करण्याची गरज आहे.

यासाठी नगरविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली आणि आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव किंवा प्रधान सचिव यांच्या सहअध्यक्षतेखाली विशेष समिती गठीत करण्यात येणार आहे. या समितीत विभागीय आयुक्त, पोलीस अधिकारी तसेच आवश्यक ते इतर अधिकारीही सहभागी असतील. ही समिती राज्यातील सर्व नर्सिंग होमचा आढावा घेऊन अनधिकृत नर्सिंग होमवर कारवाई करेल आणि संपूर्ण अहवाल पुढील अधिवेशनात सभागृहाच्या पटलावर मांडेल, असे मंत्री सामंत यांनी सांगितले.

सध्याच्या कायद्यातील तरतुदींमध्ये दंड आणि शिक्षा मर्यादित असल्याने ती अपुरी ठरत आहे. त्यामुळे कठोर कारवाईसाठी संबंधित कायद्यात आवश्यक दुरुस्ती करण्याचाही प्रस्ताव समितीमार्फत तयार करण्यात येईल

### जाहिरप्रगटन

**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बिलोली यांचे न्यायालय**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६७/२०२६

**हणमलु व ईतर विरुध्द सरुबाई व ईतर**

**अर्जदार** :- १. मुतेपोड हणमलु गिरमाजी, वय- ५४ वर्षे, रा. सगरोळी ता. बिलोली जि. नांदेड
२. गोगरोड गंगाबाई गंगाराम, वय- ७५ वर्षे, रा. बिलोली ता. बिलोली जि. नांदेड
३. येररम सयव्वा शंकर, वय- ६२ वर्षे, रा. रामगंगानगर, मंडल कोटगीर व्ही टी सी सोमपुर जि. निजामाबाद
४. काचकायला बगिरथा पेद्दा सायलु, वय- ५३ वर्षे, सर्व रा. हुन्सा ता. बोधन जि. निजामाबाद

**विरूध्द**

**गैरअर्जदार** :- १. सरुबाई सायन्ना मुतेपोड, वय- ५६ वर्षे,
२. मुतेपोड यादव सायन्ना, वय- ४१ वर्षे,
३. मुतेपोड संजय सायन्ना, वय- ३५ वर्षे, सर्व रा. सगरोळी ता. बिलोली जि. नांदेड

विषय :- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत **गिरमाजी सायन्ना मुतेपोड** यांचे अर्जदार क्र. १ हा मुलगा व अर्जदार क्र.२ ते ४ ह्या मुली आहेत. तसेच गैरअर्जदार क्र.१ ही मयताचा मुलगा मयत नामे मुतेपोड सायन्ना गिरमाजी याची पत्नी व गैरअर्जदार क्र. २ व ३ हे त्यांचे मुले आहेत. अर्जदार हे मौजे सगरोळी ता. बिलोली जि.नांदेड येथील रहिवाशी आहेत. मयत **गिरमाजी सायन्ना मुतेपोड** यांचा मृत्यु दिनांक **दि. ०७/०४/२००३** रोजी मौ. सगरोळी येथे झाला आहे. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत **गिरमाजी सायन्ना मुतेपोड** यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत **दिनांक २८/०४/२०२६** रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप/ उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि. १२ मार्च, २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, बिलोली

### Change In Name

My old name is **RAMA KISHANRAO PALE** which I am changing as New name **RAMABAI RAGHVENDRARAO UDGIRKAR**. Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.

Contact - **RAMABAI UDGIRKAR,** H.No. 2-12-212, Dhanwantri Niwas, Near Bajaj Hospital, Vazirabad, Nanded 431601 Mo.No. 9823277000

### जाहिर प्रगटन

यादवारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार शेख उम्मे सलमा शेख सलाम वय 32 रा. घर क्रं. 7-3-386/1, गरीब नवाज कॉम्लेक्स, इतवारा, नांदेड ता. जि. नांदेड यांनी दिनांक 04.02.2026 रोजी या कार्यालयात त्यांचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नाव शेख उम्मे सलमा शेख सलाम वय 32 रा. घर क्रं. 7-3-386/1, गरीब नवाज कॉम्लेक्स, इतवारा, नांदेड ता. जि. नांदेड यांचा राहते घरे घर क्रं. 7-3-386/1, गरीब नवाज कॉम्लेक्स, इतवारा, नांदेड ता. जि. नांदेड या ठिकाणी दिनांक 25.04.1993 या दिवशी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणे करीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक 04.02.2026 रोजी तहसिल कार्यालय नांदेड येथे अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक - 24.02.2026

स्थळ - नांदेड

तहसिलदार नांदेड करिता

### Change In Name

My old name is **SAWAISINH GIRDHARISINH RAJPUROHIT** which I am changing as New name **SAWAI SINGH RAJPUROHIT**. Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.

Contact - R/o. Shani Mandir, Old Mondha, Itwara Nanded 431604

### Change In Name

My old name is **VARSHA VIJAYKUMAR GAIKWAD** which I am changing as New name **VARSHA CHANDRAKANT TARKE**. Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.

Contact - VARSHA CHANDRAKANT TARKE H.No. 294, Village Kiwala, Taluka Loha, District Nanded 431707 Cell: 9923241463

### Nanded Waghala City Municipal Corporation

Telephone no:- 02462-234404 Fax No. 02462-232071 Address:-Vazirabad, Nanded E-mail address:- mech@nwcmc.gov.in

**Tender Notice No:NWCMC/Mechanical section/ 19402 /2026, Dated:- .03.2026**

**(E Tender for the Third time)** 16 MAR 2026

The Municipal Commissioner, Nanded Waghala City Municipal Corporation Nanded invites e-tenders Selection of Contractor for mechanized Cleaning of Sewerage network using all NWCMC Owned vehicle-mounted High Pressure Jetting, Suction, Suction & jetting Machines for a period of two years a for Nwcmc, Nanded. The details of the e-tender are available on website http://mahatenders.gov.in

Addi.Municipal Commissioner,
Nanded Waghala City Municipal Corporation, Nanded

विकामा/लातूर/जाहि.क्र.२०७/२०२५-२६

### महाराष्ट्र शासन

**सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड**

**ब-१ निविदा सूचना क्रमांक (२४) सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड (दूरध्वनी 02462-253711) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन **ब**-1 निविदा प्रणालीद्वारे जि.नांदेड मागवित आहेत. सदरील निविदेमध्ये 15 कामे समाविष्ट असून या निविदेअंतर्गत संपुर्ण माहिती **www.mahapwd.gov.in// http://www.paytopwd.com** या संकेतस्थळावर आवश्यक निविदा शुल्क भरुन माहिती व खरेदी (Download) करण्याचा कालावधी दि. 17.03.2026 ते 24.03.2026 पर्यंत आहे. मोहरबंद निविदा स्विकृतीचा दि. 25.03.2026 रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड येथे 14.00 वाजे पर्यंत.

उपरोक्त एकत्रीत कामांची निविदा किंमत रुपये 1.00 क़ोटी पेक्षा कमी आहेत.

टिप :- निविदा कोणतेही कारण न दर्शविता कोणत्या ही स्तरावर रद्द करणे अथवा स्विकारण्याचा अधिकार सक्षम अधिकाऱ्यांनी राखुन ठेवला आहे.

**कार्यकारी अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

विकामा/लातूर/जाहि.क्र.२०७/२०२५-२६

### जाहिर प्रगटन

सर्व जनतेस कळविण्यात येते की, माझे पक्षकार शिवराज सुभानराव मंगनाळे रा. शहाजीनगर, कंधार ता. कंधार जि. नांदेड यांनी राजीव उत्तमराव गायकवाड रा. कळका ता. कंधार जि. नांदेड यांच्या मालकी व ताब्यातील स्थित नांदेड वाघाळा महानगर पालिका हद्दीतील शहर नांदेड मौ. फत्तेजंगपूर ता. जी. नांदेड शेत गट न. १५ मधील प्लॉट न. ४४ पूर्ण जो आकृषिक झालेला असून ज्याची एकुण रुंदी दक्षिण-उत्तर ३० फुट एकूण लांबी पुर्व-पश्चिम ४० फुट म्हणजेच ज्याचे एकुण क्षेत्रफळ १२०० चौ. फुट आहे, ज्याची चतुःसिमा, पुर्वेस - रोड आहे, पश्चिमेस प्लॉट नं. ४३ आहे, दक्षिणेस प्लॉट न. ५३ आहे, उत्तरेस - प्लॉट नं. २९ आहे. सदरील चतुः सिमेच्या आतील प्लॉट माझे पक्षकारास दिनांक २८/११/२०२४ रोजी सौदा चिठी करून दिली ज्याचा रजीस्टर नोटरी क्र. १७५३ आहे. माझे पक्षकाराने सदरील सौदाचिठी (विक्रीचा करारनामा) बद्दल राजीव उत्तमराव गायकवाड यांना इसार म्हणुन बयाना रक्कम दिली आहे व लवकरच माझे पक्षकार नोंदणीकृत बैनामा (रजिस्ट्री खरेदीखत) करून घेणार आहेत. सदरील मालमत्ते सबंधी कोणाचे काहि कायदेशिर हितसबंध, आक्षेप असल्यास त्यांनी ७ दिवसाचे आत खालील दिलेल्या पत्त्यावर पुराव्या सहित आक्षेप नोंदवावा. अन्यथा माझे पक्षकार रितसर रजिस्ट्री खरेदीखत करून घेतील. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा कोणताही विचार केला जाणार नाही. सदरील सौदाचिठी करून देणार येळ्यासोबत कोणत्याच प्लॉटच्या संदर्भात कुणीही व्यवहार करू नये. केल्यास आपण सर्वस्वी जबाबदार रहाल. सबब हे जाहिर प्रगटन.

दिनांक :- १५/०३/२०२६

जाहिर प्रगटन देणार

तर्फे,

ॲड. बि.व्हि. पाटील,
कंधार.
जि. नांदेड.
मो.नं. ९५०३५६५४०१

शिवराज पि. सुभानराव मंगनाळे
रा. शहाजीनगर कंधार ता. कंधार
मो.नं. ७९७२४८९४७१

### Change In Name

My old name is **ZOHRA SHAIKH** which is now i am changing New name **JOHARABI SHAIKH GULAM ALI** hence forth my all correspondence will be done as per my new name, please consider the name.

Address :- 12-3-104 NAVI ABADEE BHOKAR ROAD MUDKHED, NANDED, MAHARASHTRA 431806 Mobile No 9158582951

### Change In Name

My old name is **RAFIQ SHAIKH** which is now i am changing New name **SHAIKH RAFIQ SHAIKH GULAM ALI** hence forth my all correspondence will be done as per my new name, please consider the name. Address :-12-3-104 NAVI ABADEE MUDKHED, NANDED, MAHARASHTRA 431806 Mobile No 9923631370


### कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
**सेवा क्लिनीक**
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## जिल्हा कृषी व धान्य महोत्सवाचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन; १२५ विविध स्टॉल प्रदर्शन व विक्रीसाठी उपलब्ध

### तीन दिवसीय नांदेड जिल्हा कृषी व धान्य महोत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** –भारत हा कृषीप्रधान देश असून, शेतकरी हा आपल्या देशाचा अन्नदाता आहे. तो प्रत्येकाच्या ताटात अन्न पोहोचविण्याचे महत्त्वाचे कार्य करतो. त्यामुळे शेतकऱ्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. उत्पादन वाढीसोबतच आर्थिक स्तर उंचावण्यासाठी शेतकऱ्यांनी आधुनिक पद्धतीने शेती करत तंत्रज्ञानाची जोड द्यावी, असे प्रतिपादन राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोक चव्हाण यांनी केले.



नांदेड येथे आयोजित जिल्हा कृषी व धान्य महोत्सव आणि प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मैदानावर जिल्हा कृषी व धान्य महोत्सवाचे १५ ते १७ मार्च या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास खासदार रविंद्र चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. देविकांत देशमुख, कृषी उपसंचालक कैलास वानखेडे, उपसंचालक आत्मा अर्चना गुंजकर, किशोर स्वामी, प्रगतशील शेतकरी, नागरिक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महोत्सवात विविध विषयांवरील शेतकरी-शास्त्रज्ञ परिसंवाद, चर्चासत्रे, उत्पादक ते ग्राहक थेट विक्री, कृषी मालाचे प्रदर्शन तसेच खरेदीदार-विक्रेता संमेलन होणार आहे.

खा. अशोक चव्हाण म्हणाले की, काळानुसार शेती करताना शेतकऱ्यांनी केवळ पारंपरिक शेतीवर अवलंबून न राहता आधुनिक व नाविन्यपूर्ण पद्धतींचा अवलंब करावा. शेतीत एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) सारख्या तंत्रज्ञानाचा वापर केल्यास उत्पादन वाढीस मदत होईल व शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या लाभ होईल. शासन शेतकऱ्यांसाठी विविध भरीव योजना राबवत असून, नुकत्याच जाहीर झालेल्या अर्थसंकल्पात २ लाख रुपयांपर्यंतचे थकीत कर्ज माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन भत्ता देण्याची तरतूद करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी या योजनांचा लाभ घेऊन विकसित भारत संकल्पनेतून नांदेड जिल्ह्याला प्रगतीच्या मार्गावर नेण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले. संयुक्त राष्ट्र संघटनेने २०२६ हे वर्ष महिला शेतकरी वर्ष म्हणून घोषित केले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील कृषी क्षेत्रात महिलांचे अतुलनीय योगदान आणि उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांनी विशेष अभिनंदन केले. या कृषी महोत्सव व प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध होण्यास मदत होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कृषी विभागाने राबविलेल्या या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले.

**शेतीसोबत शेतीपुरक व्यवसायाकडे वळा – खा. रविंद्र चव्हाण**

डिजिटल युगात शेती करताना शेतकऱ्यांना आता जगातील इतर शेतकऱ्यांशी स्पर्धा करावी लागत आहे. त्यामुळे उत्पादन कसे वाढवता येईल आणि कमी खर्चात अधिक उत्पादन कसे मिळेल याकडे शेतकऱ्यांनी लक्ष द्यावे. तसेच आधुनिक शेतीसोबत शेतीपुरक व्यवसायाकडे वळल्यास शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होईल, असे आवाहन खासदार रविंद्र चव्हाण यांनी केले.

ते पुढे म्हणाले की, या कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान, परदेशात वापरले जाणारे आधुनिक शेती तंत्रज्ञान तसेच विविध विषयांवरील चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्रांचा शेतकऱ्यांना निश्चितच फायदा होणार आहे. शेतकऱ्यांनी काळानुसार पीक पद्धतीत बदल करावा. ऊसाची उत्पादकता वाढविण्यासाठी एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) चा वापर करावा तसेच सेंद्रिय शेतीला प्राधान्य द्यावे. शेतीत विविध नाविन्यपूर्ण प्रयोग राबवून उत्पादन वाढविण्यावर भर देण्याची गरज असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

**नाविन्यपूर्ण शेती करण्यावर भर द्या – जिल्हाधिकारी राहुल कर्डिले**

शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकाऐवजी नाविन्यपूर्ण पिकांचा अवलंब करून उत्पादकता वाढीवर भर द्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. यासाठी जिल्हा प्रशासन व कृषी विभागामार्फत सातत्याने प्रयत्न करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

## राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये जिल्ह्यात ६ हजार १९९ प्रकरणे निकाली; ३८ कोटींची तडजोड



**नांदेड (प्रतिनिधी)** –राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या आदेशान्वये येथील प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा डीएलएएचे अध्यक्ष नरेंद्र ब्रह्मे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील सर्वच न्यायालयात शनिवारी राष्ट्रीय लोकअदालत घेण्यात आली. या लोकअदालतमध्ये जिल्ह्यात १९९ प्रकरणे निकाली निघाली. यामध्ये ३८ कोटींची तडजोड झाली.

सदरील लोकअदालतीमध्ये मोटार अपघात नुकसान भरपाईची प्रकरणे, दिवाणी व फौजदारी तडजोड पात्र प्रकरणे, कौटुंबिक वाद प्रकरणे, एन.आय.ॲक्टची प्रकरणे, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका वाद पुर्व मालमत्ता कराची प्रकरणे, गुन्हा कबुलीची प्रकरणे, आर.टी.ओ. व रेल्वे पोलीस विभागाची प्रकरणे, कौटुंबिक, कामगार, सहकार, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच प्रकरणे, सर्व बँक प्रकरणे, फायनान्स कंपनीची प्रकरणे, पंचायत समिती कर वसुली व दाखलपूर्व प्रकरणे, बी.एस.एन.एल. कंपनी प्रकरणे, एम.एस. ई.डी.सी.एल. कंपनी ईत्यादी प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्याकरिता जिल्ह्यात ३३ पॅनल तयार करण्यात आले होते.

दि. १४ मार्च रोजी झालेल्या लोक न्यायालयात नांदेड जिल्ह्यातील न्यायालयातील प्रलंबित एकूण १२ हजार ६२९ प्रकरणे ठेवण्यात आली होती, त्यापैकी १ हजार १३५ प्रकरणे निकाली व जवळपास २९ कोटी ८१ लाख ८४ हजार ५०२ रुपयांचे तडजोड मूल्य होते. मालमत्ता थकबाकी व पाणीपट्टीची ४ हजार ५२८ प्रकरणे निकाली निघाली व ४ कोटी ५६ लाख ३८ हजार ३८३ रूपयांचे तडजोड मूल्य होते. असे एकूण ६ हजार १९९ प्रकरणे निकाली निघाली आणि तडजोड मूल्य ३८ कोटी ४ लाख ६० हजार ७५९ रूपये एवढे आहे. विशेष म्हणजे १४ कोटींचे मुख्य दिवाणी प्रकरण आणि एम.ए.सी.टी.चे १०३ प्रकरणे या राष्ट्रीय लोकअदातीमध्ये निकाली निघाली.

## श्रीराम मंदिर संस्थानच्या वतीने श्री रामनवमी उत्सवाचे आयोजन

**किनवट (प्रतिनिधी)** –येथील श्रीराम मंदिर संस्थानच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही चैत्र नवरात्र महोत्सव व श्री रामनवमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे शुक्रवार, दि. २० मार्च ते गुरुवार २६ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित केलेली भव्य श्री रामकथा हा सोहळा असणार आहे. श्रीराम मंदिर रामनगर किनवट येथे दररोज सायंकाळी ७ ते रात्री ९ या वेळेत सुप्रसिद्ध कथावाचक प्रा. तपनकुमार मिश्रा आपल्या रसाळ वाणीतून प्रभू श्रीरामांच्या पावन जीवनचरित्राचे दर्शन घडवणार आहेत. भक्ती आणि सत्संगाच्या या सोहळ्याचा लाभ सर्व भाविकांनी घ्यावा, असे आवाहन संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

या महोत्सवाचा मुख्य सोहळा गुरुवार, दि. २६ मार्च २०२६ रोजी रामनवमीच्या दिवशी संपन्न होणार आहे. या दिवशी पहाटे ५ वाजता महाअभिषेक व पूजन करण्यात येईल. त्यानंतर सकाळी ७ वाजता सामूहिक आरतीचा कार्यक्रम होईल. सकाळी ९ वाजता शहरातून भव्य बाईक रॅली काढण्यात येणार असून दुपारी १२ वाजता प्रभू श्रीरामांचा जन्मोत्सव सोहळा मोठ्या थाटामाटात साजरा केला जाणार आहे.

## ॲबॅकस स्पर्धेत रुद्रवंश कवटीकवार देशात प्रथम



**नांदेड (प्रतिनिधी)** –ब्लू बेल्स इंग्लिश स्कूल नायगावच्या रुद्रवंश दत्तात्रय कवटीकवार या विद्यार्थ्याने राष्ट्रीय स्तरावरील ॲबॅकस स्पर्धेत देशात प्रथम क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्याच्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल खा. रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी त्याचा सत्कार करून अभिनंदन केले.

रुद्रवंश याच्या या यशस्वी कामगिरीमुळे त्याची मलेशिया येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय ॲबॅकस स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याच्या या यशाबद्दल खा. रविंद्र पा चव्हाण यांनी रुद्रवंशचे कौतुक केले.

यावेळी केशवराव चव्हाण, हनुमंतराव चव्हाण, श्रीनिवास चव्हाण, विजय चव्हाण, प्राचार्य बाबासाहेब शिंदे, अध्यक्ष डॉ. के हरीबाबू, मुख्याध्यापिका सौ. लक्ष्मी, प्राचार्य डॉ. मुकुंद मैड, सुनंदा मामीडवार व टाकळगावचे ग्रामस्थ उपस्थित होते.

## स्वारातीम विद्यापीठातील गणितीय शास्त्रे संकुलात परंपरा, गणित आणि स्त्रीशक्तीचा संगम

**नांदेड (प्रतिनिधी)** – स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या गणितीय शास्त्रे संकुलात 'पारंपरिक दिवस २०२६' व Pi Day मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. Heritage Hustle: Celebrating Womanhood (वारसा आणि जिद्द : स्त्रीत्वाचा उत्सव) या संकल्पनेवर आधारित हा कार्यक्रम महाराष्ट्र शासनाच्या 'स्वयंसिद्धा' उपक्रमांतर्गत आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आला होता. गणितीय शास्त्रे संकुल आणि पाय-क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने असा त्रिवेणी संगम कार्यक्रम पार पडला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन होते. प्रमुख पाहुण्या म्हणून कंधारच्या उपविभागीय पोलीस अधिकारी तथा अतिरिक्त गृह पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय) डॉ. अश्विनी रामदास जगताप उपस्थित होत्या. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, विज्ञान व तंत्रज्ञान संकुलाचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेसचे प्रभारी संचालक डॉ. शैलेश वढेर, आंतरिक गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी तसेच गणितीय शास्त्रे संकुलाच्या संचालिका प्रा. डॉ. रुपाली जैन व्यासपीठावर उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात डॉ. अशोक महाजन यांनी राष्ट्रनिर्मितीत महिलांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. भारताची संस्कृती आणि परंपरेचा खरा वारसा महिलांच्या कर्तृत्वातून प्रकट होत असल्याचे त्यांनी नमूद केले. आधुनिक युगात महिलांनी प्रत्येक क्षेत्रात आपली क्षमता सिद्ध केली असून, सांस्कृतिक वारशाचे भान राखत पुढे जाण्याची प्रेरणा या उपक्रमातून मिळते, असे ते म्हणाले.

प्रमुख पाहुण्या डॉ. अश्विनी रामदास जगताप यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महिलांचे समाजातील वाढते योगदान, शिक्षणाचे महत्त्व आणि आत्मविश्वासाच्या बळावर महिलांनी विविध क्षेत्रांत मिळवलेले यश यावर प्रकाश टाकला. आधुनिक काळात महिलांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते, मात्र कुटुंब आणि समाजाच्या पाठबळामुळे त्या अधिक सक्षमपणे पुढे जातात, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा. डॉ. रुपाली जैन यांनी Heritage Hustle या संकल्पनेचे स्पष्टीकरण करताना स्त्री-पुरुष समानता ही स्पर्धा नसून परस्पर सहकार्य आणि आदर यावर आधारित असल्याचे सांगितले. पुरुष आणि महिला एकमेकांच्या पुरक ठरून कार्य केल्यास समाजाच्या प्रगतीला नवे बळ मिळते, असे त्यांनी नमूद केले.

## अमरजीतसिंग रामगडिया यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)**– वजिराबाद भागातील मल्टीपर्पज हायस्कूलच्या शेजारी राहणारे सिख समाजातील प्रतिष्ठित नागरिक अमरजीतसिंघ गुरुबख्शसिंघ रामगडिया (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने सोमवार, दि. १६ मार्च रोजी निधन झाले. ते श्री गुरु गोबिंदसिंघजी सिल्वर कप टुर्नामेंट समितीचे फाउंडर वाईस प्रेसिडेंट, मराठवाड़ा ज्योतिष विद्यापीठाचे वाईस प्रेसिडेंट, श्री कलगीधर गुरु गोबिंदसिंघजी एजुकेशन सोसायटी नांदेड़चे फाउंडर मेम्बर आणि ट्रेजरर होते. त्यांच्या पार्थिवावर मंगळवार, दि. १७ मार्च रोजी सकाळी ११ वाजता नगीनाघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांची अंत्ययात्रा त्यांचे राहते घर बसंत बसेरा, वजिराबाद येथून निघणार आहे.

## मनपा स्थायी व महिला बालकल्याण समितीवर सिडको भागातील चार सदस्यांची निवड

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – नांवामनपाच्या नवीन नांदेड भागातील प्रभाग क्रमांक १९ व २० मधील चार सदस्यांची स्थायी समिती व महिला बालकल्याण समितीच्या सदस्यपदी सर्वसाधारण सभेत निवड करण्यात आली आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा १६ मार्च रोजी मनपाच्या सभागृहात महापौर सौ. कविता मुळे व उपमहापौर दीपक रावत, आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे व उपायुक्त अजितपाल सिंग संधू यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी सभागृह नेते ॲड. महेश कनकदंडे यांनी भाजपा नगरसेवक यांच्या सदस्य पदाची यादी



दिली. स्थायी समितीच्या सदस्यपदी सिडको परिसरातील मनपा प्रभाग क्रमांक १९ मधील भाजपा नगरसेविका सौ. दीपाली मोरे, अभिषेक सौदे यांची तर महिला बालकल्याण समितीच्या सदस्यपदी भाजपा नगरसेविका सौ.निरंजना लांडगे व सुलोचना काकडे यांची निवड करण्यात आली.

## पांगरी शिवारात मुरुमाचे उत्खनन जोमात; ब्लास्टिंग करून तस्करी

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड शहरापासून जवळच असलेल्या पांगरी शिवारात मुरूम माफिया सक्रिय झाले आहेत. ब्लास्टिंगद्वारे मुरूम उत्खनन करून हजारो ब्रास मुरूम काळ्या बाजारात विक्री होत आहे.



नांदेड तालुक्यातील पांगरीतर्फे असदवन येथे गायरान जमिनीमध्ये बोअर ब्लॉस्टींग करून गौण खनिज (मुरुम) उत्खनन मोठ्या प्रमाणात सुरु आहे. ब्लास्टिंगच्या आवाजामुळे व रात्रंदिवस चालणाऱ्या हायवा वाहनांमुळे या परिसरातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या पाठीमागे पांगरीतर्फे असदवन डेन्टल कॉलेजच्या बाजूच्या परिसरातील जमिनीमध्ये अंदाजे ३०० ते ४०० ब्रास मुरुम उत्खनन करण्याची परवानगी घेऊन बोअर ब्लॉस्टींग करुन मुरुम माफिया हे जास्तीचे हजारो ब्रास मुरुम उत्खनन करीत आहेत.

याबाबत सखोल चौकशी करुन ETS मोजणी करुन दंडात्मक काक्षेज्ञलन करावी. जेणे करुन शासनाचा महसुल बुडणार नाही, अशी तक्रार शेख एजास यांनी विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे केली आहे. या प्रकरणी योग्य ती चौकशी करुन त्याबाबत संबंधितांवर कारवाई करावी आणि शासनाचा बुडणारा महसूल वसूल करण्यात यावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. एकंदरीत या प्रकाराकडे नांदेड तहसील कार्यालय दुर्लक्ष करत आहे की काय? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## पुस्तकामुळेच माणूस घडतो - जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**नांदेड (प्रतिनिधी)** –माणसांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्याची ताकद पुस्तक वाचनात असते. कायदे किंवा नियमांच्या आधारे बदल घडवता येत नाहीत. ते स्वयंप्रेरणेनेच घडतात. त्यामुळे वाचनाची सवय प्रत्येकाने जोपासली पाहिजे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

नांदेड ग्रंथोत्सव २०२५ च्या समारोप प्रसंगी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अच्युत बन होते. व्यासपीठावर माजी जि. प. अध्यक्ष संभाजीराव धुळगंडे, जिल्हा नियोजन अधिकारी अर्जुन झाडे, जिल्हा कोषागार अधिकारी विक्रम देशमुख, शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे, प्रकाशक निर्मलकुमार सूर्यवंशी, ग्रंथालय अधिकारी अनिल सूर्यवंशी, निरीक्षक प्रताप सूर्यवंशी, राजेंद्र हंबीरे, गोविंद वडगावकर आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी कर्डिले म्हणाले की, मला लहानपणापासून वाचनाची सवय आहे. पुस्तकावर केलेली गुंतवणूक आयुष्यात खूप काही देऊन जाते. लेखक आपल्या लेखनातून एकाच वेळी हजारो लोकांशी संवाद साधतात. आपण सर्व भाषांतील पुस्तके वाचली पाहिजेत. मराठी भाषेला मोठा साहित्यिक वारसा लाभला आहे. मोबाईलच्या युगात वाचन करणे म्हणजे प्रवाहाच्या विरुद्ध पोहण्यासारखे आहे; मात्र हे आव्हान स्वीकारणे गरजेचे आहे.

कामाच्या व्यापातूनही वाचनाची सवय कायम ठेवत असल्याचे सांगत त्यांनी सेतुमाधव पगडी लिखित आणि कै. नरहर कुरुंदकर यांच्या प्रस्तावनेचे 'छत्रपती शिवाजी' हे पुस्तक सध्या वाचत असल्याचे सांगितले. तसेच या कार्यक्रमाला शासकीय सोपस्कार म्हणून नव्हे तर एक वाचक व ग्रंथप्रेमी म्हणून उपस्थित असल्याचेही त्यांनी नमूद केले. वाचन चळवळ वाढवणे ही केवळ शासनाची जबाबदारी नसून समाजातील प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.



यावेळी शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना पुस्तके देऊन वाचनाची गोडी लावावी, असे मत व्यक्त केले. माजी जि.प. अध्यक्ष संभाजीराव धुळगंडे यांनी ग्रंथालयीन कर्मचारी अत्यंत कमी मानधनावर काम करत असून त्यांचे मानधन वाढविण्याची गरज असल्याचे सांगितले. तसेच ग्रंथालय क्षेत्रातील अडचणी सोडविण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमात जिल्हा नियोजन अधिकारी अर्जुन झाडे व राजेंद्र हंबीरे यांनीही मनोगत व्यक्त केले. अध्यक्ष डॉ. अच्युत बन यांनी मराठी भाषेचा वापर वाढविण्याचे आवाहन करत 'बन साहित्य प्रतिष्ठान'च्या वतीने गेल्या पंचवीस वर्षांपासून साहित्यिक पुरस्कार देण्यात येत असल्याची माहिती दिली. वाचनाच्या आवडीमुळे जागतिक साहित्य संमेलन व इतर कार्यक्रमांसाठी आतापर्यंत ५५ देशांना भेट दिल्याचेही त्यांनी सांगितले.

या वेळी ग्रंथोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्यांचा तसेच वाचकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला सार्वजनिक ग्रंथालयांचे पदाधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गोविंद फाजगे यांनी केले. सूत्रसंचालन चंद्रकांत तघडफल्ले यांनी केले. तर आभार जिल्हा ग्रंथालय अधिकारी अनिल सूर्यवंशी यांनी मानले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com